

# माणूस

१९ जानेवारी ७४
पन्नास पैसे

गिरीश
कर्नाड

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१९ जानेवारी १९७४

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : चौतीसावा

## सप्रेम नमस्कार....

९ जानेवारी १९७४

□ २२ डिसेंबर ७३ व ५ जानेवारी ७४ चा 'माणूस' वाचला. त्यामधील 'मग बेळगावला उशीर का? व 'बेळगावचे मराठीपण' हे वाचले. श्री. सोमण यांच्या लेखापेक्षा श्री. पाठक यांचा लेख अर्थपूर्ण वाटला. सदर लेखात सत्य परिस्थिती दिसून येते. कारण त्यांनी उदाहरणासह पटवून दिलेले आहे. व त्यांचे वास्तव्य यास साक्ष आहे.

सीमाप्रश्नाच्या ओघात आमच्या शेजारी असलेल्या मराठी भाषिक, कर्नाटक प्रदेशाचा कधीच कुणी विचार करीत नाहीत असे नेहमीच प्रत्ययास येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील उदगीर तालुक्यालगत असलेले संतपूर, औराद व भालकी हे दोन तालुके व त्यामधील खेडी तसेच हुमनाबाद तालुक्यातील, निलंगा तालुक्या लगत असलेली खेडी ही सर्व मराठी भाषिक आहेत. ही सर्व खेडी भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या आजुबाजूच्या मराठी प्रदेशाशी जखडलेली आहेत.

उदगीर शहरात आजुबाजूच्या मराठी भाषिक कर्नाटक प्रदेशातील जनतेचे प्रमाण व्यापार व शिक्षण या निमित्ताने वाढते आहे. त्यामुळे इकडील लोकांना हा प्रश्न 'बेळगाव' पेक्षा जास्त जिवंत व जिव्हाळ्याचा वाटतो.

संतपूर, औराद, भालकी व हुमनाबाद तालुक्याच्या काही भागात मराठी माध्यमातून शाळा व कॉलेज चालतात यावरून तो संपूर्ण भाग किती मराठीमय आहे हे सिद्ध होते. त्या भागातून दोन आमदार मराठी भाषिकच आहेत व यांची निवड या गोष्टीस साक्ष देते.

त्यामुळे पूर्वीप्रमाणे 'बेळगाव, निपाणी, कारवार, भालकी, संतपूर, औराद सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे असे एका आवाजात का म्हणत नाहीत ?'

**रमाकांत पिंपळगावकर**
उदगीर, जि. उस्मानाबाद.

मुखपृष्ठ छाया : देवीदास बागूल

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

वैराग, लातूर, सिन्नर, मालेगाव, इस्लामपूर, तुमसर, फैजपूर...

## आणि वणी : ग्रामीण जनआंदोलनाची

# वाढती कमान

पन्नालाल सुराणा

वणी (जि. यवतमाळ) येथे ता. ४ जानेवारी १९७४ रोजी मी जाऊन ता. २ जाने. च्या सर्व घटनांची चौकशी केली. महाराष्ट्र बंदच्या कार्यक्रमाशी संबंधित राजकीय कार्यकर्ते, ता. २ जाने. च्या घटनांशी संबंधित व्यक्ती आणि इतर नागरिक यांच्या भेटी घेतल्या. या सर्व चौकशीतून माझे असे निश्चित मत बनले आहे की, फौजदार श्री. तिवारी आणि सर्कल इन्स्पेक्टर श्री. पालवे यांच्या घमेंडखोर वर्तणुकी-मुळेच ता. २ जाने. च्या भयानक घटना घडल्या आणि सात निरपराध जिवांचे बळी गेले.

वणी हे यवतमाळपासून ६४ मैला-वरील तहसील व सबडिव्हिजनचे ठाणे असलेले पंचवीस हजार वस्तीचे शहर आहे. या भागात या वर्षी कपाशीचे पीक साधारण आहे. सरकारने एका-धिकार खरेदीचा भाव फार कमी ठेवला असल्याने शेतकऱ्यात तीव्र असंतोष आहे. बराचसा कापूस शेजा-रील आंध्र राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यात गेला आहे. वणीला नेहमी पन्नास ते साठ हजार गाड्या कापूस यायचा, यंदा आतापर्यंत जेमतेम सहाशे गाड्या आल्या आहेत. आंध्रकडे कापूस नेताना पोलिसांना पैसे द्यावे लागतात. शीरपूर या सीमेवरील पोलीस स्टेशन-वर श्री. तिवारी यांची नेमणूक अस-ल्याने त्यांनी व सर्कल इन्स्पेक्टर श्री. पालवे यांनी हजारो रुपये गेल्या काही दिवसात कमावले असे बोलले जाते. या भागात ज्वारीचीही अती पावसामुळे नापिकी झाली आहे. बाजारात गहू, तांदूळ, ज्वारी फारच कमी मिळते व त्यांचे भाव फारच वाढले आहेत. स्वस्त धान्य दुकानातून गेले दोन-तीन महिने दरमहा दर माणशी जेमतेम १ किलो धान्य देण्यात आले. धान्य टंचाई

विरुद्ध २६ नोव्हें. ७३ ला सुमारे ८०० महिलांचा लाटणे मोर्चा निघाला होता. पण त्यानंतरही धान्य पुरवठ्यात सुधारणा झाली नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र – बंदच्या आदेशानुसार २ जानेवारीला वणी – बंदचा कार्यक्रम अपक्ष आमदार श्री. दा. सी. नांदेकर, समाजवादी पक्षाचे श्री. प्रल्हादराव रेभे, मार्क्सिस्ट कम्युनिस्ट श्री. दौलतराव शेंडे, भारतीय कम्युनिस्ट श्री. नामदेवराव काळे वगैरेंनी मिळून संघटित केला होता. त्यानुसार ता. ३१ डिसेंबर रोजी जाहीर सभा झाली. ता. २ जाने. रोजी बंद बरोबर दुपारी २ वाजता मोर्चा काढण्याचेही ठरले होते.

ता. २ जाने. रोजी सकाळी पावणे सहाला आमदार नांदेकर, रेभे, शेंडे व पंधरा-वीस कार्यकर्ते एस्. टी. डेपोकडे गेले. डेपोच्या बाहेर थेट हमरस्त्यावर ते थांबले. त्यांच्या विनंतीवरून डेपो मॅनेजर तेथे आले. आजच्या बंदच्या कार्यक्रमामुळे एस. टी. गाड्याही बंद ठेवाव्यात अशी कार्यकर्त्यांनी केलेली विनंती डेपो मॅनेजरनी मान्य केली. त्यावेळी वणी पोलिस स्टेशनचे सबइन्स्पेक्टर श्री. पाटीलही तेथे हजर होते. त्याप्रमाणे बाहेर आणलेल्या दोन बसेस डेपो मॅनेजरांनी परत आत नेल्या. तेवढ्यात सर्कल पोलिस इन्स्पेक्टर श्री. पालवे तेथे आले. ते म्हणाले की कुठल्याही परिस्थितीत बसेस सुटल्या पाहिजेत. श्री. पालवेंनी श्री. नांदेकर वगैरे सर्व कार्यकर्त्यांना अटक केल्याचे सांगून पोलीस स्टेशनवर नेऊन बसविले.

एस्. टी. च्या तीन-चार गाड्या डेपोतून बाहेर आणून स्टॅण्डला लावण्यात आल्या. त्यापैकी दोन गेल्यानंतर तिसरी गाडी जाऊ नये यासाठी काही नागरिक बसच्या समोर येऊन उभे राहिले. त्यात असलेल्या एका बारा-तेरा वर्षाच्या मुलाला पोलीस जमादाराने काठीने खूप मारले. त्यामुळे लोक चिडले आणि ते सगळे घोळक्याने जवळच असलेल्या पोलीस स्टेशनवर गेले. त्या जमादाराला ताबडतोब सस्पेंड करा आणि पकडलेल्या पुढाऱ्यांना सोडून द्या अशी मागणी ते करू लागले. नऊ सव्वानऊ पर्यंत हा प्रकार चालला.

याच सुमारास शीरपूर पोलीस स्टेशनचे फौजदार श्री. तिवारी हे दुपारच्या मोर्चाच्या बंदोवस्तासाठी मोटर सायकलवरून वणीला आले. रघुनाथ चौकात त्यांनी रस्त्यात उभ्या असलेल्या एका मुलाला मारले. टिळक पुतळ्याजवळ जमलेल्या लोकांपैकी काही जणांनी ओरडून त्यांना म्हटले "तिवारीजी जरा संभलके जाना" त्यावर तेही जोरात म्हणाले, "मुझे किसका डर है. मेरे पास पिस्तोल है. कौन मेरा बाल बाका कर सकता है" त्यांच्या या उतरामुळे चिडून काही जण त्यांच्यामागे धावले. टिळक पुतळ्यापासून २५–३० फुटावर असलेल्या फॉरेस्ट रेंजरच्या कम्पाऊण्डमध्ये त्याने आपली मोटार सायकल घुसविली. लगबगीने तो ऑफिसात शिरला. रेंजर ऑफिसच्या सभोवती जमाव जमला

पृष्ठ ४३ वर

# गिरिश कर्नाड फिल्म इन्स्टिटयूटमधे

## देवीदास बागूल

नव्या वर्षांच्या सुरुवातीला पुणे शहरात हिवाळा बहरलेला असताना दोन उबदार गोष्टींची भेट पुणेकरांना मिळाली. क्रीडाप्रेमी लोकांना राष्ट्रीय टेनिसच्या स्पर्धा पाहण्याची संधी मिळाली आणि कलाप्रेमी लोकांना नाटयचित्रपटक्षेत्रातील अव्वल दर्जाच्या व्यक्तीचा तीन वर्षांकरता लाभ घडला. गिरीश कार्नाड हा नव्या नव्हाळीचा तरुण कलावंत एक जानेवारीपासून फिल्म इन्स्टिटयूटमध्ये संचालकपदावर आरूढ झाला.

महाराष्ट्राला स्वत:शिवाय आजवर फक्त बंगाली कलावंतच काय ते ओळखीचे आणि मोलाचे वाटत होते. बंगालीशिवाय इतर भाषीयांमध्ये कोणी कलावंत असतील काय अशी शंका काढायलाही वेळ नसताना हा कानडी माणूस मराठी रंगभूमीवर पदार्पण करतो काय आणि रसिकांच्या मनात ठाण मांडतो कसा ? आणि त्याच्या कानडी चित्रपटांनीही मराठी बघ्यांना वेध कसा लावला ? इतक्या गोष्टी घडतात न घडतात तोच खुद्द सरकार स्वारी पुण्यपत्तनी येऊन डेरेदाखल झाली आणि येऊन नव्याचे नऊ दिवस होतात न होतात तोच नऊ जानेवारीला ह्या तरुण गड्याने 'घाशीराम कोतवाल' ह्या मराठी नाटकाचा प्रयोग इन्स्टिटयूमध्ये विद्यार्थ्यांसाठी करवला. पुण्याच्या तरुण लोकांनी हा प्रयोग बंद पाडण्याचा पराक्रम केला होता म्हणे. पण इन्स्टिटयूमधले तरुण विद्यार्थी हा प्रयोग पाहताना जे तरारून घुमारत होते ते पाहिल्यावर नव्या राज्यातील प्रयोगशीलतेच्या वातावरणनिर्मितीचा प्रसन्न इशाराच मिळाला असे नि:संकोचपणे म्हणावेसे वाटते.

त्याच नि:संकोचपणाच्या मोकळ्याढाकळ्या वृत्तीने मी गिरीश कार्नाडांना

भेटावयास गेलो आणि त्यांच्याशी पोट-भर गप्पा मारल्या. मधून मधून चवी-पुरते गंभीर प्रश्न विचारले आणि त्यांनीही मधून मधून गंभीर चेहरा करून त्यांची उत्तरे दिली.

**कलेमध्ये जुनी पिढी, नवी पिढी, असे आपण मानता काय ?**

समाजात जोपर्यंत नवी पिढी, जुनी पिढी अशी समस्या जिवंत असेल तो-पर्यंत कलेमध्येही ती अस्तित्वात असणा-रच असणार. पण कलेमधील त्या समस्येचे अस्तित्व कसे आणि कोठवर असावे ही गोष्ट समाजातील तो झगडा किती मूलगामी आहे यावर अवलंबून असेल. उदाहरणार्थ, १९४० साली कानडीत पुरोगामी लेखकांनी खूपच विवाद्य लिखाण केले आणि पूर्वीच्या लेखकांना हीन लेखले. पण आज तेच लेखक त्या जुन्या पिढीचाच एक भाग वाटायला लागलेत. जुन्या पिढीतील लेखकांची अलंकरणप्रचुर शैली आणि भावविवशता ह्या गोष्टी त्या नावे ठेवणाऱ्या लेखकांच्या लेखनातही दिस-तात. म्हणून मी असे म्हणेन की प्रत्येक पिढीपुढे ' नवे ' अगर ' जुने ' प्रश्न उभे असतात, पण त्यातील भेद हा व्यक्तींचा नसून व्यक्तित्वाचा असतो.

**ययाती, तुघलक, हयवदन ही नाटके कोणत्या पिढीचे प्रश्न मांडतात ?**

(' बॉबी 'मध्ये केवळ तरुण पिढीचंच नव्हे तर जुन्या करारी, काहीशा जुन्या पिढीचंही चित्रण राजकपूरनं केलय ' असं कर्नाडसाहेब ' केसरी 'त म्हणाले होते. त्या संदर्भात त्यांना अडवण्या-साठी मी हा आडवा प्रश्न विचारला.)

पुष्कळ टीकाकारांना ' ययाती 'मध्ये ' जुने विरुद्ध नवे ' असा झगडा दिसला. जुन्यांचा प्रतिनिधी ययाती तर नव्यांचा पुरू. संतप्त आणि बंडखोर. त्या टीका-कारांना पुरुमधील नायकविन्मुखता (अँटीहिरो) ही एकप्रकारे भारतीय तरुणांमधील विफलता आणि यातना यांची प्रातिनिधिक वाटते. पण अगदी प्रामाणिकपणे सांगायचे म्हणजे माझ्या मनात तसला काही एक विचार नव्हता. म्हणजे मला असं म्हणायचंय की माझ्या मनापुढे दोन पिढ्यांमधील झगडा यायच्या ऐवजी दोन व्यक्तित्वामधील झगडा उभा होता. अर्थात लोकांना पुरुमध्ये व्यापक संदर्भ दिसला याचं मला बरं वाटलं. मात्र ' तुघलक ' किंवा ' हयवदन 'मध्ये तसला कोणताच प्रश्न मांडलेला नाही.

खरं सांगायचं म्हणजे मी आपल्या पिढीचं प्रतिनिधित्व करतो असं काही म्हणता यायचं नाही. मी तसला कोणताही विचारच केलेला नाही. ज्याचा मला स्वतःला वेध लागतो त्याबद्दल मी लिहितो आणि ते माझं लेखन सर्वां-साठी असतं—मग तो तरुण असो वा म्हातारा असो, साक्षर असो किंवा निरक्षर.

**आपण कलावंत आहात म्हणजे काय ? कलेचा निर्माता म्हणून की कलेचा समाजावर होणाऱ्या परिणामाचा निरीक्षक म्हणून ?**

कलावंत म्हणजे काय हे मला माहीत नाही. मी लिहितो, कारण मला त्यात

आनंद वाटतो, त्यात मी रममाण होतो. मी चित्रपट चित्रीत करतो, कारण मला त्यात आनंद वाटतो, ते काम करताना मी रमतो. मागे वळून पाहताना तर मला त्यात आलेल्या अडचणीसुद्धा मनोरम वाटतात. आणि जोवर माझं काम लोकांना मनोरम, रंजक, सूचक, विचारप्रवर्तक वाटतं तोवर मी कलावंत आहे याचा मला आनंद होतो. कलावंत हा समाजसुधारकसुद्धा असेल. पण त्यानं तसं असलंच पाहिजे याची आवश्यकता नाही. मला असं वाटतं की, कलाकृतीचे प्राथमिक प्रयोजन रंजन करणे हे आहे. रंजन करणे म्हणजे सुख देणे. बाकीच्या गोष्टी नंतर.

ब्रेख्तची गोष्ट माहीत आहे ना? त्याने आपल्या वेळच्या प्रचलित रंगभूमीला विरोध करीत करीतच स्वतःच्या उमेदवारीचा प्रारंभ केला. विरोध का? तर ती रंगभूमी प्रेक्षकांना आत्मविस्मृत करीत असे. त्याला असं वाटे की, रंगभूमीने शिकवावं, लोकांना आपल्या अवतीभवतीचे प्रश्न पाहायला लावावं. पण वीस वर्षांच्या रंगभूमीच्या अनुभवानंतर त्यानं आपला दृष्टिकोन बदलला. उत्तरायुष्यात तो असं म्हणू लागला की, 'श्रमिकांचे मनोरंजन करणं' हेच रंगभूमीचं मुख्य प्रयोजन आहे.

कलावंताला जर खरोखर काही म्हणण्यासारखं म्हणायचं असेल तर ते कलाकृतीतून व्यक्त होईलच. तेवढा प्रामाणिक तो स्वतःशी असला मात्र पाहिजे.

आपल्या कलाकृतीतून उच्च आदर्शांचा उद्घोष करायचा आणि आचरण करताना मात्र वेगळ्याच मूल्यांची कास धरायची, असं जे कलावंत करतात ते अप्रामाणिक आहेत असं मला वाटतं. असल्या अप्रामाणिकपणामुळं त्यांची प्रज्ञा विकीर्ण होते.

उद्या जर मला असं आढळून आलं की, माझ्यातली 'निर्मिती' संपली आहे तर मला त्याचं काही फारसं वाटणार नाही. जीवनातील अनेक मार्गांपैकी कला ही एक मार्ग आहे, ती काही जीवनाला पर्याय होऊ शकत नाही.

**कला शिकविणे म्हणजे नेमके काय?**

शिकवून काही गुण निर्माण करता येत नाहीत, गुणांना पैलू पाडता येतात. अगोदर मुळातच काही प्रमाणात गुण हवेत, कलात्मक प्रज्ञा हवी. हे मात्र खरं की, शिकविण्यामुळं साधारण दर्जाचा कलावंत हा चांगल्यापैकी कलावंत होऊ शकतो, किंवा चांगल्याचा अधिक चांगला होतो. 'कला शिकविणं' म्हणजे आपल्या जवळच्या गुणांचा उत्तम उपयोग करायला शिकविणं आणि गुणांचं वर्धन करायला शिकविणं. हे खरं आहे की, मोठमोठे कलावंत तांत्रिक बाबी उपजतबुद्धीनंच हस्तगत करतात. पण कधीकधी ह्या तांत्रिक गोष्टींचं भान नसल्यानं किंवा तिकडं दुर्लक्ष केल्यामुळं पुष्कळ गुणवान लोकांचा विकास झाला नाही, नव्हे त्यांनी आपल्या गुणांचा नाशही करून घेतला. आपणा सर्वांना एक गोष्ट माहीतच आहे की, संगीतात किंवा चित्रकलेत अविश्रांत मेहनत लागते.

मात्र नट, कवी किंवा नाटककार यांना त्या मेहनतीची गरजच लागत नाही असंच आपण धरून चालतो. इथंच आपली मूलभूत चूक होते. उमेदवारीच्या काळात जर शिक्षण मिळालं तर प्रत्येक कलावंत आपला दर्जा सुधारू शकतो— मग तो चित्रकार असो किंवा कवी, नाटककार असो.

**तुम्ही कलानिर्मिती का करता ?**

मी कशानं तरी अस्वस्थ होतो म्हणून आणि माझी ही अस्वस्थता इतरांना कळावी, त्यांना त्यात सहभागी करावं, म्हणून मी कलाकृती निर्माण करतो. ह्या अस्वस्थतेला कारणीभूत म्हणून एखादी कल्पना असेल, किंवा मी पाहिलेली वा ऐकलेली गोष्ट असेल. त्या गोष्टीनं माझ्या मनात घेतलेली वळणं, रूपं इतरांना सांगणं ही माझी एक गरज बनते. म्हणूनच 'कलावंत आत्मविष्कारासाठी लिहितो की इतरांसाठी लिहितो ?' हा प्रश्न मला निरर्थक वाटतो. आंघोळीच्या वेळचे गाणे ही कला नव्हे, किंवा पाठ खाजवणं म्हणजे कला नव्हे. कलेला रसिक हवाच हवा. ती स्वयंसिद्ध असूच शकत नाही, अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

**व्यवस्थापनाच्या रगाड्यात आपण आपल्या कलानिर्मितीचं कसं सांभाळणार ?**

मला जर वाटलं तर प्रतिवर्षी एक चित्रपट तयार करण्याची मला परवानगी मिळाली आहे, ही मोठीच कृपा आहे.

पण महत्त्वाची बाब दुसरीच आहे. कलाप्रवृत्ती ही जणू जीवनापासून फटकून वागणारी गोष्ट आहे, ती हवेत करण्यासारखी बाब आहे, हे मला मुळीच मान्य नाही. जीवनाच्या कोणत्याही अंगात, प्रत्यंगात, माणूस कलावंत म्हणूनच वावरतो, वावरू शकतो; मग ते अंग व्यवस्थापनाचं असेना का ! त्यात कोणाला यश मिळेल, किंवा न मिळेल. पण हा धोका कोणत्याही कलासाधनेत अंगभूत असतोच. दुसरं असं की, इथं व्यवस्थापनाशिवाय मला करण्यासारखं इतर पुष्कळच आहे. शिकवण्याचं काम आहेच की ! चित्रपटनिर्मितीचा अनुभव माझ्या गाठीला आहे, आणि विद्यार्थ्यांना त्याचा फायदा उठवता येईल. ● ● ●

मानवत आघाडी

# आणखी एक बन्सी वाळके

दि. २ जानेवारी

रमाकांत कुलकर्णी आणि वाकटकर या गाजलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना चांगलाच धक्का त्यांनी हातात सूत्रे घेतल्याक्षणीच मिळाला. त्यांनी जोरात काम करायला सुरुवात केली. कोणते मोठे प्रयत्न ते करणार होते? आतापर्यंतचे पोलीस अधिकारी कमी कार्यक्षम होते काय?

पोलिसांना आणि मानवतच्या लोकांना नीट माहीत असलेल्या अनेक कारणांमुळे पोलीस खऱ्या माणसांना पकडण्यास असमर्थ ठरले होते. ही कारणे अजून दूर झालेली दिसत नाहीत. त्यामुळे अजून तरी त्यांच्याकडून फारशा अपेक्षा बाळगणे योग्य होणार नाही.

मध्यंतरी मुंबईस गेलो असताना गृहखात्याच्या सेक्रेटरीची भेट घेतली. शरद पवारांनी जाहीर केलेल्या ७ जणांच्या टोळीतील काही मुख्य माणसांची नावे तपासून पाहिली, त्या व्यक्तींना अटक होण्याबाबत चौकशी करून पाहिली. सेक्रेटरी हसत हसत आत्मविश्वासाने म्हणाले, 'थांबा, वाट पहा. दोन दिवसात तुम्हाला काहीतरी सांगूच.'

आता काही गोष्टी उघडपणे एकदाच्या लिहून टाकण्याची पाळी आली आहे.

शरद पवारांशी या आधीच संपर्क साधण्यात आलेला होता. आ. मृणाल गोरे, पन्नालाल सुराणा यांनी मानवतला भेट देऊन सर्व परिस्थिती शरद पवारांच्या कानावर घातली होती. 'मी मानवतला जाऊन काय फरक पडणार' असे त्यांचे मत.

खुनी टोळीची व सूत्रधाराची नावे शरद पवारांजवळ आहेत. पण 'एव्हीडन्स अॅक्ट'च्या अडचणीमुळे त्यांना काही करता येत नाही असे त्यांचे म्हणणे. विरोधी पक्षाच्या लोकांना किंवा मुंबईतल्या एखाद्या सामान्य भाजी विकणाऱ्या बाईला भारत संरक्षण कायद्याखाली त्यांचे शिपाईदल पकडू शकते! ज्यांचे जीवन स्टॉलवर पडलेल्या पुस्तकासारखे उघडे आहे अशा ग्रामीण भागातल्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांवर चॅप्टर केसेस घालून त्यांना वर्षानुवर्षे हैराण करण्याचा पोलिसांचा इतिहास आहे हे शरद पवारांना माहीत नाही काय? मग ज्यांची नावे पोलिसांना माहीत आहेत त्या 'प्रतिष्ठितां'वर अशी कारवाई करून त्यांच्यावर दडपण आणणे पवारांना शक्य नाही काय? पवारांनी एकदा मानवतला जाऊन पहावे म्हणजे 'ती'

माणसे किती गुर्मीत वागताहेत, 'आमचे कोणीच काही करू शकत नाहीत' अशा मस्तीत वावरताहेत हे त्यांना पाहायला मिळेल. अशा प्रकारची कारवाई करून त्यांना जबरा धाक न बसवल्याचा परिणाम म्हणून २।३ जणांना आपल्या मुलांच्या हत्येचा शोक करीत बसण्याची पाळी आली आहे असेच नाइलाजाने म्हणण्याची पाळी येते आहे.

शरद पवारांच्या 'थांबा, वाट पहा'चा अर्थ काय लावायचा ?

२।३ दिवसांनी काही लोकांना पकडल्याची बातमी आली.

समिंदराबाई, बाज्या व पल्या या तिघांसह इतर काही किरकोळ माणसांवर ३०२ कलमाखाली आरोप ठेवण्यात आले आहेत.

समिंदराबाई ही म्हणे मुख्य सूत्रधार आहे. इतके खून करून पोलिसांना सतत खेळवीत राहणारी ही बाई! (पोलिसांचे मत) अशा या बाईने कोंडिबा रुळेला ज्या कुऱ्हाडीने मारले ती कुऱ्हाड दाखविली. ती कुऱ्हाड धूत असताना, त्यावरचे रक्ताचे डाग धूऊन टाकताना ती सापडली म्हणे. कसा विश्वास ठेवायचा ? इतकी बावळट बाई गेले कित्येक महिने मोडक-ब्रॅगांझा वगैरेंना झुलवते आहे, इतके पोलीसही बावळट! पोलीस एक सुरस कथा सांगतात. बज्या व पल्या ह्या दोन भुरट्या चोऱ्या करणाऱ्यांच्याकडून काही पैसे समिंदराबाईला येणे होते. त्या पैशांच्या बदल्यात तिने हा खून करवून घेतला. शेतातली कणसे चोरणारे लहानसहान गुन्हेगार ३ खून करू शकतात यावरच विश्वास बसणे कठीण आहे. त्यातून १५० रुपयांसारख्या रकमेसाठी कोणी खून करील यावरही विश्वास बसणे कठीण आहे. आता त्यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

समिंदराबाईने गुन्हा कबूल केला आहे असे म्हणतात. नेमके काय घडले आहे ते पोलीसच जाणोत. पण समिंदराबाईच्या मुलीचे म्हणणे असे आहे की तिच्या आईकडून पोलिसी मार्गाने तसे वदवून घेण्यात आले आहे. खरे खोटे ठरवणे कठीण आहे.

हे सर्व लिहिताना खरे पहाता खूप वाईट वाटते. पण इलाज नाही. कारण मानवत प्रकरणात पोलिसांचा इतिहास तितकासा चांगला नाही.

श्री. मोडक या प्रकरणात 'फारच' रस घेताहेत. काही पोलीस अधिकाऱ्यांचे व त्यांचे जमत नाहीसे दिसते. स्वतः क्रेडिट लाटण्याचा सतत प्रयत्न ते करीत असावेत. बन्सी वाळके प्रकरणी त्यांनी स्वतःचे हसे करून घेतले. यावेळीही फार उत्साहाने ते मानवतला जाऊन समिंदराबाई व अन्य लोकांना पकडताना आपण काही फार प्रचंड काम करीत आहोत असा त्यांचा आविर्भाव होता. बन्सी वाळकेला ते 'कन्व्हीक्शन' करणार होते. आता तो सुटला आहे. पोलीस काही थातूर मातूर करण्यासाठी, स्वतः कसेतरी यातून सुटण्याची धडपड करण्यासाठी कोणावर तरी आरोप ठेवतात व नंतर पचका करून घेतात. ह्याच अनुभव आता

समिंदराबाईच्या बाबतीत येणार असे वाटू लागले आहे. मुख्य माणसे सतत दूरच राहतात हा अनुभव. पोलिसांना खरोखरच काही करायचे आहे किंवा नाही? एकदा पोलिसांनी स्पष्टपणे सांगावे. या प्रकरणात पोलिसांनी सातत्याने कसा चावटपणा केला आहे त्यावर एक पुस्तकच होईल.

एक गोष्ट पुन: एकदा स्पष्ट व्हायला पाहिजे. या खून मालिकेकडे सनसनाटी रहस्यमय खून अशा दृष्टीने आमच्या सारखे लोक पहात नाहीत. हजारो किरकोळ गुन्हे व शेकडो खून होत असतात, त्यांच्या पाठी मी लागणार नाही. मानवतमध्ये वाटेल त्या हद्दी-पर्यंतचे धोके पत्करून रस घेण्यापाठी कारणे वेगळी आहेत. सामान्य, गरीब घरच्या मुलींचे बळी पडत राहतात, हे सरकार त्यांना रोखू शकत नाही. मानवत हे एक बेबंद सुभेदाराने चालव-लेले गाव आहे असे वाटावे असेच प्रकार घडत आहेत. सामान्य माणसाला या देशात सुखाने झोप घेता येऊ शकणार आहे किंवा नाही या प्रश्नाची शहानिशा करण्यासाठीच एवढा प्रपंच करावा लागतो आहे.

शरद पवारांनी स्वत: आता मानवत-मध्ये मुक्काम करावा. साधे नव्हे तर गुप्त पोलीस खात्याच्या अधिकाऱ्यांनाही पैसे दिले जात असावेत अशी जवळ जवळ खात्री व्हावी अशी काही अधि-काऱ्यांची वागणूक आहे. येणाऱ्या वार्ता-हरांची बडदास्त ठेवण्याचा प्रयत्न पोलीस अधिकारी आणि काही प्रति-ष्ठीत आलटून पालटून करीत असतात, धमक्यांचे अस्त्र बोथट झाल्यावर! काय कारणे असावीत? यावेळी एवढेच पुरे!

**टीप** : समिंदराबाईला पकडल्याबद्दल मोडकांनी स्वत:चा सत्कार पोलीस ठाण्यात करवून घेतला व धन्य झाले. ◻

मानवत दि. ३ जानेवारी,

ताजा कलम :

दि. २ रोजी महत्त्वाची घटना घडली आहे.

तुक्या पारध्याला पोलिसांनी अटक केली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातल्या हरेगाव साखर कारखान्यात तुक्याला पोलिसांनी पकडले आहे. पळता पळता त्याने झटा-पट करून ४ पोलिसांना जखमी केले आहे.

३ तारखेला त्याला पाथरीला नेले गेले. त्याने पोलिसांना जबाब दिला आहे.

आपणच दाढी लावून आणि काळा बुरखा घालून खून केले आहेत अशी कबुली दिली आहे. ब्लेडने मुलींच्या गुप्त भागावर जखमा करून देवाला त्यावरचे रक्त वाहिले; गुप्त धनासाठीच आपण हे खून केले आहेत अशीही त्याने कबुली दिली आहे, असे पोलीस सांग-तात. हा तुक्या म्हणजे रुक्मीणीबाई या पारधी महिलेचा भाऊ. ही रुक्मीणीबाई

म्हणजे उत्तमराव बारहातेची रखेली जिला अगोदरच पकडण्यात आले आहे.

कोंडीबा रुळेच्या खुनाबद्दल गिरफ्तार झालेली समिंदराबाई ही रुक्मिणी बाईची वहीण; म्हणजे तुक्याची बहीण.

मुख्य आरोपी अशा शब्दात प्रत्येक अटक झालेल्याचे वर्णन पोलीस करतात. हे खरे नसावे. खुनाच्या टोळीतली ही माणसे जरूर आहेत.

पण, कर्ता करविता अजून बाहेरच आहे.

आता फास आवळला जातो आहे.

पण कर्ता करविता फासाच्या फांद्यात येणार काय ?

पोलिसांची मुर्दुमकी खरी तेथेच आहे. ◻

## एक चिमणी आली
## एक खून करून गेली !

---

दिनांक ७ जानेवारी

विश्वास बसत नाही ना ?

मानवतमध्ये आणखी एक नव्हे एकदम तीन खून झाले आहेत.

कथा अशी.

४ तारखेला दुपारी ११॥ वाजण्याच्या सुमारास हरीबाई (३० वर्षे) आपल्या कमला (२ वर्षे) व तारा (१० वर्षे) या दोन मुलींना बरोबर घेऊन कुप्रसिद्ध आंबेगाव परिसरात असलेल्या एका शेतात काम करणाऱ्या आपल्या दिराला भाकरी पोचवण्यासाठी निघाली.

१ वाजेपर्यंत भाकरी मिळू न शकल्याने भुकावलेला तिचा दीर चौकशी करण्यासाठी म्हणून घरी आला.

त्याला समजले की ११ वाजताच हरीबाई मुलींसह भाकऱ्या घेऊन निघाली आहे.

दीर हादरला. वाट पाहिली. इकडे तिकडे शोधले.

चौकशी केली. पोलिसात तक्रार नोंदवली.

पोलिसांची धावपळ सुरू झाली.

गावातली पोरेही तपासाला निघाली.

रात्री ९ च्या सुमाराला एक प्रेत मिळालं, तपास जारीच राहिला. सकाळी ६ च्या सुमारात आणखी दोन प्रेते मिळाली.

हरीबाई, कमला, तारा तिघींचेही खून झाले होते.

तिघींची प्रेते एकमेकापासून जवळ जवळ होती. रक्ताचे ओघळ आसपास होते.

२ वर्षांच्या कमलाला गरगर फिरवून, दगडावर आपटून मारण्यात आले होते. कवटी फुटल्याने ती मेली.

हरीबाईच्या तोंडावर कुऱ्हाडीचे घाव होते, १४ ते १५. तिचे प्रेत ओढून आणून ज्वारीच्या शेतात टाकण्यात आले होते.

ताराच्या तोंडावरही १४–१५ कुऱ्हाडीचे घाव होते. रक्ताचे थारोळे आसपास पसरले होते. २–३ घावात

मेलेल्या ताराच्या तोंडावर (१५ घाव)

प्रकार असा झाला (असावा).

तिघीजणी एकत्र होत्या. तारा हाताशी होती आणि कमला कडेवर होती. डोक्यावर भाकरीचे टोपले. पहिला घाव पाठीमागून हरीबाईच्या मानेवर झाला. कमला घाबरून पळाली. तिला आपटून ठार मारण्यात आले. पळणाऱ्या तारावर एक घाव घालण्यात आला. ती एका बाजूला पळून गेली. दूर गेलेल्या हरीबाईचा पाठलाग झाला. तिला मारून टाकण्यात आले. राहिली तारा. तिला थोड्या अंतरावर गाठून ठार मारण्यात आले.

सर्व प्रकार १० मिनिटाच्या आतला.

भर दुपारी ११ ते १ या वेळामधला.

आसपासच्या शेतात बरीच माणसे बंडिगच्या कामावर आहेत.

तरीही खून झाले आहेत.

एकाच मुलाने केवळ किंकाळ्या ऐकल्या आहेत. ११ वाजता त्या बाईला जाताना त्या मुलाने पाहिले आहे.

पण जवळच्या शेतात माळावर बसून राखण करणाऱ्या माणसाने काही पाहिलेले नाही, काही ऐकलेले नाही. त्या माळाची जागा फार छान आहे, इतक्या अंतरावर की जिथून खुनाच्या जागच्या माणसांचे चेहरेही ओळखता येतील.

माळावरचा माणूस म्हणतो की नेमका ११ नंतरच तो घरी निघून गेला.

खून झालेल्या जागेपासून फार तर मैलभराच्या अंतरावर पांढरीच्या मारुतीजवळ पोलीसांची चौकी थाटण्यात आली आहे, एका तंबूत. तेथे २४ तास पहारा असतो. पण तेथल्या पोलिसांना किंकाळ्या ऐकू आल्या नाहीत; पोलीस त्यामुळे खुनाच्या जागी धावून जाऊ शकले नाहीत.

यावेळच्या खुनाबाबत बरेचसे वेगळेपण आहे. पहिल्या प्रथमच आरोपी काही पुरावे सोडून गेले आहेत. हरीबाईच्या अंगाखाली शर्टाची फाटून शिल्लक राहिलेली बाही मिळाली आहे.

रक्ताचे ओघळ आहेत. तारा आणि हरीबाई यांनी झटापट केलेली आहे. खुन्यांचा हल्ला पाठीमागून आहे. मारण्याच्या पद्धतीवरून फार घाईघाईने, त्वेषाने, चिडीने खून केले गेले आहेत हे स्पष्ट होते आहे. एकदम तिघींवर हल्ला करण्याचा प्रकार पहिल्यांदाच आहे. अशा प्रकारे तिघींवर हल्ला करण्यात धोके आहेत हे माहीत असूनही खून झाला आहे.

इतक्या घाईगर्दीत, वेळ साधून, दिवसा ढवळ्या आसपास खूप माणसे असतानाही हे खून का होतात? ठरलेल्या आराखड्याप्रमाणे खून उरकून घेण्याची घाई खुन्यांना झाली असावी, पोलिसांनी आपल्या माणसांना पकडले म्हणून हा खून केला, किंवा पकडलेली गेलेली माणसे निर्दोष सिद्ध करण्याचा खटाटोपही असेल. बारहातेला पकडल्यावर, बन्सी वाळकेला पकडल्यावर, समिंदराबाईला पकडल्यावर प्रत्येक वेळी खून होत गेले आहेत हा इतिहास आहे.

पृष्ठ १६ वर

# रेणापूरची 'स्वच्छ' निवडणूक

डॉ. द्वारकादास लोहिया. अंबेजोगाई

रेणापूर–बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत. २६ डिसेंबरच्या या गावच्या ग्रामपंचायतीची निवडणूक झाली. जुन्यांना शह बसला. नवीन टीम निवडून आली. काँग्रेसप्रणीत उमेदवारांना जबर हार खावी लागली. हा परिस्थितीचा परिणाम की कार्यकर्त्यांचे कष्ट की जनजागृती यासंबंधी विचार करणे आवश्यक होऊन बसले आहे.

रेणापूर दहा हजार वस्तीचे गाव आहे. दलित, मुसलमान, लमाणी, धनगर आदींची लोकसंख्या प्रामुख्याने या गावात आहे. अंबेजोगाई तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या या गावात काँग्रेस आणि लोकशाही आघाडी ह्या दोन राजकीय संघटना. मॅट्रीकपर्यंत शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. खाजगी प्रॅक्टीस करणारे २–३ डॉक्टर्सही आहेत. जनावरांचा आठवडी बाजार मोठा भरतो. त्यामुळे दूरपर्यंत या गावची ख्याती आहे. पोलीस-स्टेशन, सब-पॉवर स्टेशन, फोन-तार ऑफिस आहे.

खरीप व रब्बी या दोन्ही हंगामाची पिके घेण्याजोगी उत्तम शेती आहे. लातूर हे व्यापारी शहर केवळ १८ कि. मी. अंतरावर असल्यामुळे व्यापार उदीम बरा चालतो. थोडीशी फॅशन–थोडीशी आधुनिक संस्कृती अधून मधून डोकावते. बगलेत सतत ट्रान्झिस्टर घेऊन फिरणारे, रस्त्यावर भरधाव सायकल मारणारे, बेकार तरुणही बरेच आहेत. सिनेमाच्या गप्पा मारीत–धर्मेंद्र-जितेंद्रच्या स्टाइलमध्ये ह्या हॉटेलमधून त्या पानपट्टीवर फेऱ्या मारणारे व मधून मधून राजकारणाच्या गप्पा मारणारे सुशिक्षित बेकारही येथे कमी नाहीत. हायब्रीड आणि $H_4$ कापसाचा नाद लागलेले थोडेसे शेतकरी आहेत आणि राब राब राबून आला दिवस मागे टाकणारे ८०% मजूरही आहेत. आर्य समाजाचे काम करणारे निष्ठावंत कार्यकर्ते, साम्यवादी तत्त्वप्रणालीशी समरस होणारे शेतकरी-कामगार, अधून मधून सर्वोदयासाठी विनोबांना मानणारे वयस्क आणि सत्तेच्या गुळाला चिटकणारे पांढरपेशे या सर्वांनी बसलेले हे गाव मोठे बहुरंगी–बहुढंगी आहे.

सोसायटीचे राजकारण करण्यात इथले लोक वाकबगार दिसतात. मात्र सहकारी चळवळीतील दोषाचेच दिग्दर्शन इथेही घडले. विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे ९०० सभासद आहेत. १० लाखाचे भांडवल असलेल्या या सोसायटीवर लोक खूश नाहीत. ढोर-

सोसायटीही आहे म्हणतात. पण त्यातून किती ढोरांचा फायदा झाला हे माहीत नाही. तेली-सहकारी सोसायटी नाममात्र आहे. ऑईल-मिल सुरू करण्याचा प्रयत्न झाला. पण भग्न अवशेषाशिवाय विशेष काही शिल्लक नाही. त्यामुळे या तेलगिरणीसंबंधी हातावर तेल घालूनच प्रचार होतो. सेंट्रल बँकेची शाखा आहे. को. ऑ. बँकही आहे.

अशा या गावात एकदाची ग्रामपंचायत निवडणूक पार पडली आणि सारा गाव ढवळून निघाला. काँग्रेस पक्ष आणि लोकशाही आघाडी यांच्यात चुरशीचा सामना झाला. गेली २ वर्षे लोकशाही आघाडीचे काम गावात चालू आई. श्रमिकांचे लढे लढण्यास सदैव सिद्ध असलेले कार्यकर्ते आणि सत्तेत स्थान न मिळालेले पण जनतेसाठी धडपड करणारे कार्यकर्ते अशांची ही आघाडी आहे. गावातील भ्रष्ट ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार बाहेर काढण्याचे काम या आघाडीने बजावले.

१५ ते २० हजार रु. खर्च करून, मतदानाच्या दिवशी मटन खाण्याचे आमंत्रण देऊनही उपाशी मतदारांनी प्रस्थापितांना धूळ चारली याला दुष्काळातील सामुदायिक विहिरी, मस्टरातील सावळा गोंधळ, मजुरीचे उशिरा वाटप आणि स्वस्त धान्य दुकानातील तुटीचा धान्यपुरवठा आदि गोष्टी कारणीभूत ठरल्या असल्या तरीही या गोष्टी चव्हाटयावर मांडणारे कार्यकर्ते लोकशाही आघाडीतीलच होते. श्री. एम. खुमसे यांचे संघटना चातुर्य, दुष्काळात बजावलेली प्रामाणिक कामगिरी, गोविंदराव जाधव, चक्रे आदींनी दाखवलेली धडाडी आणि आर. के. पाटील (माजी पंचायत समिती सदस्य) यांचे काँग्रेसच्या एका गटाशी संबंध असून देखील प्रसंगी जनतेच्या बाजूने दाखवलेला स्पष्टवक्तेपणा यामुळेच लोकशाही आघाडीचे यश निश्चित होण्यास मदत झाली असेच म्हणावे लागेल.

दुष्काळात लोकशाही आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जिवाचे रान केले व सर्व प्रश्नावर सतत ८–१० महिने मजुरांना लहान शेतकऱ्यांना साथ दिली. त्यांना मार्गदर्शन केले, शासनावर दबाब आणला. मजूरी वेळेवर मिळावी म्हणून याचं रेणापूरच्या डाकबंगल्यात बी. डी. ओ. इंजिनीयर, तहसीलदार, यांना अनेक वेळा घेराव केला. इंजिनियरला तर चक्क कोंडून टाकले होते. स्थानिक शाळेच्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी जिल्ह्याचे पालक मंत्री श्री. सुंदरराव सोळुंके रेणापूरला गेले होते. त्यांच्या प्रेमी जनांनी त्यांना शाही मेजवानी देण्याचा बेत केला पण जनतेच्या दबावामुळे मेजवानीचा बेत ऐनवेळी बदलून रेणापुरात तयार झालेले पक्वान्न समसापूरच्या शिवारात नेऊन खावे लागले होते. स्वस्त धान्य दुकानदारांच्या दुकानातून योग्य रेशन मिळवून देण्यापासून प्राथमिक आरोग्य केंद्रातील दुर्लक्षित आजाऱ्यापर्यंत सर्वच क्षेत्रात श्री. एम. खुमसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष लक्ष घातले.

दुष्काळात दबलेल्या व मागासलेल्या वर्गात हक्काची नवी जाणीव निर्माण झाली. स्पष्टपणे बोलण्याची हिम्मत उपाशी जनतेत आली. विशेषत: स्त्री वर्गात नवी क्रान्ती झाली. त्याचे पडसाद या निवडणुकीत उमटलेले दिसतात. रेणापूरच्या या निवडणुकीत कॉंग्रेस पुरस्कृत उमेदवाराची निवडणूक खूण होती– छत्री, वाघ आणि माणूस. वॉर्डा-वॉर्डातून त्यांचे प्रचारक हिंडत व छत्री वाघ व माणूस याला मते द्या असे सांगत. एका स्त्री मतदाराने त्याला दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे. ती बाई म्हणाली, "छत्रीच्या सावलीत बसायला काय आता उन्हाळा हाय. जवा जे पाय्‌जे तवा तर ते तुमी देत नाई. वाघाला मते आमी नाही देनार त्यो आमचं नरडं धरील–तुमी दुष्काळात धरल्यावनी. अन् हा मानूस कशाला ? कुपनाच्या दुकानावर आमचे कुपन हिसकावून घ्यायला व्हय. न्हाई आमी न्हाय तुमाला मत देणार."

पैसे घेऊन घरातील मतदान कॉंग्रेसच्या उसेदवाराला, करण्यासाठी केवळ वायकोने कडाडून विरोध केला म्हणून बिचाऱ्या नवऱ्याने उमेदवाराने मतासाठी दिलेले पैसे नाइलाजाने परत केल्याचे उदाहरण याच गावी पाहायला मिळाले.

याउलट लोकशाही आघाडीच्या उमेदवाराचे काम होते. श्री. एम. खुमसे ज्या वॉर्डातून उभे होते तो वॉर्ड गावापासून एक दीड कि. मी. अंतरावर असलेल्या वाड्यातून पसरलेला होता. विशेष म्हणजे त्यांच्या जातीचे फारच कमी मतदार त्या वॉर्डात होते. लमाण आदी मतदारांची संख्या जास्त होती. तरीपण त्यांनी एक नवी योजना आखली. ते म्हणायचे, ज्यांना मला मते द्यावयाची आहेत, माझ्या कामावर विश्वास आहे त्यांनी मताला वीस पैसे (२०) याप्रमाणे माझ्या निवडणूक फंडास मदत करावी. आणि काय आश्चर्य ! त्यांच्या वार्डातील ४१० मतदारांनी असे पैसे लोकशाही आघाडीच्या कार्यालयात भरून त्याची रशीद घेतली. श्री. एम. खुमसेंना निवडणूकीत ४९० मते पडून ते निवडून आले तेव्हा उरलेल्या ८० मतदारांनी कार्यालयात नंतर पैसे भरले. हा प्रयोग खरोखरच अनोखा आणि नवीन आहे. पैसे घेऊन मते विकणारे मतदार पाहिले पण मते आणि पैसे देणारा मतदार आजच्या काळात तयार करणे साधी गोष्ट नाही.

---


# एका पराभवाची कहाणी

**ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे**

**मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन**


---

रेणापूरच्या ग्रामपंचायतीत एकंदर १५ जागा होत्या. पैकी १२ जागा लोकशाही आघाडीने पटकावल्या. सुमारे ५००० मतदारांपैकी २२९२ मते लोकशाही आघाडीच्या उमेदवारांना पडली. काँग्रेस पुरस्कृत उमेदवारास १४८० मते पडली. बाकी मते बाद झाली. काही मतदार गैरहजर होते. काँग्रेसचा एवढा दारूण पराभव स्वातंत्र्योत्तर काळात रेणापूरच्या ग्रामपंचायतीत केव्हाच झाला नव्हता. या निवडणुकीने जनतेच्या आकांक्षा उंचावून ठेवल्या आहेत व याची जाणीवही विजयी उमेदवारांना आहेच. सत्काराच्या सभेत लोकशाही आघाडीचे एक उमेदवार म्हणाले की, 'तुमच्या उपयोगी आम्ही पडलो नाही, तुमच्याशी बेइमानी केली तर तुम्ही आमची गाढवावरून धिंड काढा' हे त्याचेच द्योतक आहे.

श्री. खुमसे यांना मी विचारले की, 'आता तुम्ही निवडून आला आहात पुढील काळात तुमच्या ग्रामपंचायतीचे स्वरूप काय राहील.' ते म्हणाले, 'आमची ग्रामपंचायत ही एक प्रोसिजिरल बॉडी राहील. जे काही करायचे ते जनतेला विचारूनच होईल. वॉर्डा-वॉर्डात ११ सदस्यांची एक कमिटी राहील. तिच्या शिफारसीला आमची ग्रामपंचायत प्राधान्य देईल. ७–१२ चे उतारे त्वरित मिळवून देण्यापासून सर्व कामे तीच कमिटी पाहील. आम्ही आमचा वेळ वर्गलढ्यासाठी खर्च करणार. जनतेला राजकीय व सामाजिक प्रश्नावर सतत जागृत ठेवण्याचे काम आम्हाला करायचे आहे.'

थोड्याफार फरकाने हे चित्र सबंध अंबेजोगाई तालुक्याचे आहे. या निवडणुकीत ९०% सरपंच पराजित झाले. पैसे घेऊनही ठिकठिकाणी मतदारांनी शाश्वत सत्तेच्या भागीदारांना मते दिली नाहीत. अनेक ग्रामपंचायतीतून नवे चेहरे, नवे नेतृत्व उदयाला येत आहे. दुष्काळी जनतेने सत्तेला दिलेले हे आव्हान आहे. ● ● ●

---

## मानवत आघाडी : पृष्ठ १२ वरून

एक अत्यंत भयावह निष्कर्ष निघतो. कदाचित खुन्यांच्या टोळीतली आणखी काही माणसे आणि खुनांचे संचालन करणारा माणूस असे बरेच लोक अजूनही बाहेर असतील. म्हणजेच आणखी काही खून तर होणार नाहीत ना ? शक्यता तशी दिसते.

पोलिसांचा पहारा वाढतो आहे. पण जोपर्यंत मूळ माणसे बाहेर आहेत तोपर्यंत बाकीच्या सर्व तपासाच्या गोष्टी निरुपयोगी आहेत.

पोलिसांच्या कुत्र्यांनी काही लोकांना पकडून दिले आहे. कधी नव्हे तो मानवतकरांनी मानवत बंद घडवून आणला आहे.

आता पुढे काय ?

माणसे किती 'बाहेर' राहिली आहेत ह्यावरच सर्व अवलंबून आहे. ●●

# मोलकरी

## 'मराठा तितुका मेळवावा'

थोरांच्या सहचारिणी थोर असतात. किंबहुना, सहचारिणी थोर असतात म्हणूनच थोर हे थोर होतात. (आमची सहचारिणी थोर असती तर आम्ही खचित थोर झालो असतो : चाल— 'अशीच आमची आई असती सुंदर रूपवती' वगैरे.) जगाच्या इतिहासात अशी कितीतरी थोर युगुले होऊन गेली आहेत. इतिहासाचे सोडा आणि जगाचेही सोडा, या महाराष्ट्रात आजसुद्धा अशी कितीतरी थोर युगुले दाखवता येतील. उदाहरणार्थ, सहकारदादा वसंतराव पाटील आणि त्यांच्या पत्नी, इंदिरा सहकारी बँकेच्या संचालिकाबाई शालिनीताई पाटील हे युगुल पाहा. वसंतदादा मंत्री आहेत; तेव्हा ते थोर आहेत हे मुद्दाम सांगायची गरज नाही. परंतु वसंतदादा शालिनीबाईंमुळे थोर झाले, हे आपल्या सर्वांना चांगले ठाऊक नाही काय ? आहे.

सौ. शालिनीबाई पाटील यांच्या थोरवीचे दोन पैलू आहेत : एक, त्यांची स्वतःची, स्वयंभू थोरवी. या थोरवीमुळे त्या वकील आणि इंदिरा सहकारी बँकेच्या संचालिका झाल्या. दुसऱ्या, पत्नीपदाच्या थोरवीमुळे, त्या वसंतदादांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद बहाल करायच्या प्रयत्नात आहेत. यासाठी त्यांनी लोकशाही मार्गाने लोकमत जागृत करायची आघाडी उघडली आहे. परवाच, एका व्याख्यानात, त्यांनी मंत्रीपदे (विशेषतः मुख्यमंत्रिपद) न्यायाधीश, सचीवपदे आदी सर्वच मराठा समाजाच्या हक्काचे असूनही त्याला या महाराष्ट्रराज्यात ते मिळाले नाही, याबद्दल जोरदार तक्रार करून 'मराठा तितुका मेळवावा' या ऐतिहासिक आवाहनाचा नव्याने उच्चार केला.

सौ. शालिनीबाईंचे प्रस्तुत वक्तव्य अत्यंत समयोचित आहे, असेच म्हटले पाहिजे. आज या क्षत्रिय महाराष्ट्रात मराठ्यांची नुसती ससेहोलपट चालली आहे. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात मराठ्याला सर्वोच्च स्थान मिळू नये, यासाठी सगळे अल्पसंख्याक एक होऊन कटकारस्थाने करीत आहेत आणि अशा विपत्काळी मराठा समाजातले करंटे नेते आपसात भांडत बसले आहेत. कोणीतरी त्यांना कानपिचक्या देऊन भानावर आणणं अत्यंत जरूरीचे होते. शालिनीबाईंनी ते केले याबद्दल मी त्यांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद देतो. कारण महाराष्ट्रराज्य मराठ्यांचे आहे आणि मराठा मेला की महाराष्ट्रराज्य मेले, अशी शालिनीबाईंप्रमाणे माझीसुद्धा धारणा आहे.

त्यामुळे शालिनीबाईंच्या वक्तव्यावर चहूकडून झालेली बेजबाबदार टीका पाहून मी फार व्यथित झालो. टीकाकारांच्या मते महाराष्ट्रराज्य हे मराठ्यांचे नव्हे तर मराठीचे राज्य असले पाहिजे. हे टीकाकार एकीकडे हीनगंडाने आणि दुसरीकडे मराठाद्वेषाने पछाडलेले आहेत, असे मला नाईलाजाने म्हणणे भाग आहे.

सौ. शालिनीबाईंच्या वक्तव्यामुळे त्यांच्यात आणि वसंतदादांच्यात भांडण झाले तर मियाबिबीच्या भांडणात अवघ्या महाराष्ट्रराज्याचे नुकसान होईल. तसे न होवो. ● ● ●

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## एक प्रकाशझोत विचारांचा

परवाच्या दिवशी भाऊ अचानक आले. भाऊ म्हणजे डॉ. श्री. ल. काशीकर. अख्ख्या नागपुरात डॉ. श्री. ल. चे नाव माहीत नाही असा माणूस नसेल. भाऊ डॉक्टर झाले पण धंदा मात्र केला नाही. मुंबईचा माणूस युवक संघटनेच्या निमित्ताने नागपुरात आला नि तेच आपले कार्यक्षेत्र ठरवून बसला. ट्रेड युनियनचे काम करता करता भाऊंनी खस्ता खाल्ल्या तशी अमाप लोकप्रियताही मिळवली. आज ते NFITU (नॅशनल फ्रंट ऑफ इंडस्ट्रियल ट्रेड युनियन) चे कार्यदक्ष सभासद आहेत आणि रिझर्व बँक कर्मचारी फेडरेशनचे अध्यक्ष आहेत. कामानिमित्त देशाबाहेर हिंडून आल्यामुळे त्यांच्या विचारांनी क्षितिजे रुंदावली आहेत. तिकडील परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केल्यामुळे आपल्याकडील लोकांच्या गुणदोषांचे अचूक विवेचन करण्याची दृष्टी त्यांना लाभली आहे. भाऊ बोलतात ते धरण फुटल्यासारखे. भारदस्त आवाज, लोकांचे चित्त आकर्षून घेण्याची हातोटी आणि कमालीचा मुद्देसूदपणा ही त्यांच्या वक्तव्याची वैशिष्टचे. थोडया शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे कौशल्य त्यांचेजवळ आहे.

असे हे भाऊ परवा अचानक आले. अतिपूर्वेचा दौरा आटोपून ते सरळ कलकत्त्यालाच उतरले. त्यांचेशी पाऊण तास झालेल्या संभाषणातून काही विचार ग्रहण करता आले. भाऊ निघून गेल्यानंतरही ते मनात रेंगाळत राहिले.

आजची नवी पिढी...भाऊंचा तिच्यावर विश्वास आहे. तिच्याजवळ एनर्जी आहे, ब्रेन आहे, पण ऑब्जेक्टिव्ह नाही. नक्षलवादी ?... त्यांच्या विचारसरणीवर भाऊंचा विश्वास आहे. पण त्यांच्यात अँन्टी-सोशल एलिमेंट घुसले, शिवाय त्यांच्याजवळ प्लॅनिंग नव्हतं... अन् म्हणून त्यांना अपयश आले असे ते म्हणतात.

आजच्या दुष्टचक्रमय परिस्थितीतून मार्ग काढायसाठी काय करायला हवे ? असे विचारले तेव्हा ते म्हणाले—काही दिवसाकरिता तरी मार्शल लॉ प्रस्थापित करायचा हाच सर्वप्रथम उपाय. त्यायोगे प्रॉडक्शन कंट्रोल करायचे. मालक आणि मजूर सर्वांना सारखाच कायदा लागू करायचा. मालकावर वचक बसवायचा. प्रॉडक्शन वाढवायचे. आज व्यक्तिपूजा आणि स्वार्थ ह्यामागे सारे लागले आहेत. एखादा निर्णय तातडीने घ्यायचा असेल तर काँग्रेस अध्यक्ष पंतप्रधानांच्या अनुपस्थितीत तो घेत

नाहीत. ते म्हणतात पंतप्रधानांना येऊ द्या. त्यांना विचारून ठरवतो. हे असे का? काँग्रेस अध्यक्ष आपल्या अधिकारात हे का करू शकत नाही?... दुसरा उपाय म्हणजे कामकरी वर्गात सोशल कॉन्शसनेस निर्माण करायचा, व तिसरी गोष्ट, प्रांजळ कार्यकर्ते तयार करायचे. प्रॉडक्शनच्या क्षेत्रातील राजकीय वर्चस्व नष्ट करायचे.

इंदिरा गांधींबद्दल तुमचे मत काय आहे? म्हणून विचारले तेव्हा ते म्हणाले, बाईंनी तीन गोष्टी फार चांगल्या केल्या. एक : नक्षलवादी हिंसक कृत्यांना आळा घातला. दोन : जातीयवाद्यांना चचक घालून दिला आणि तीन : देशात कम्युनिझम येऊ दिला नाही.

कम्युनिझम आला असता तर विशेष काय बिघडले असते? मी मध्येच विचारले.

भाऊ म्हणाले, कम्युनिझमच्या समानतेच्या तत्त्वांबरोबर समाजात नैतिक अध:पतनाचाही शिरकाव झाला असता. आपल्या समाजातील नैतिक मूल्ये अजूनही कायम आहेत. परदेशीय समाजासारखा सावळा गोंधळ आपल्याकडे नाही. कारण अजूनही आपला समाज परंपरा व संस्कृती टिकवून आहे. ह्या गोष्टींचा अन्यत्र प्रकर्षाने अभाव आढळतो. परवा शिकागोमध्ये एका विद्वान अमेरिकन माणसाने मला म्हटले, All your countrymen not to ape us. We have no basis of cultural values. Ahd so we are ünhappy in that way.

भाऊ पुढे म्हणाले, अलीकडे आर्थिक परिस्थिती मात्र बाईंच्या हातून निसटू लागली आहे. संधीसाधू लोक त्यांच्या अंवतीभोवती आहेत. त्या स्वत: पर्सनॅलिटी कल्ट वाढवण्याच्या मागे लागल्या आहेत, त्यांच्या वागण्याला डिक्टेटरशिपचा वास येतो. आणि ते फार वाईट. कारण जिथे डिक्टेटरशिप

---


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

आहे तिथे अविश्वासाची भावना प्रबळ होते. जवळच्या माणसाचाही संशय येऊ लागतो. अविश्वास निर्माण झाला की initiative संपतो. आणि त्यामुळे अनर्थ ओढवतो. आजच्या विद्यार्थ्यांचा शिक्षणावर विश्वास का नाही? ह्या प्रश्नाला त्यांनी एकाच वाक्यात उत्तर दिले. ते म्हणाले, शिक्षणाचा उद्देश ज्ञानार्जन नसून अर्थार्जन हा आहे तोवर मुलांना त्यात रस वाटणार नाही आणि योग्य नवरा मिळवणे हा उद्देश ठेवल्यामुळे मुलीही शिक्षणात रस घेऊ शकत नाहीत. शिक्षणतज्ज्ञांना हे कळते पण तरीही ते शिक्षण पद्धती बदलायला तयार नाहीत.

कॉफी थंड होऊ लागली म्हणून भाऊंनी कप हाती घेतला. दोन घोट घेतल्यावर पुन्हा बोलायला सुरुवात झाली. म्हणाले—

शासनाने आपला समाज कसा बनवून टाकला कल्पना आहे? माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलं–कसा?

दहशतीने भयग्रस्त. दैनंदिन विवंचनांनी चिंताग्रस्त आणि आमिषाने व अनुदानाने आश्रित. ही मजल इथपर्यंत गेली की स्वातंत्र्य सैनिकांना देखील अनुदान देऊन आश्रित करून टाकले गेले. ज्यांनी ती स्वीकारली त्यांचे कर्तृत्व तेथेच संपले. ज्यांनी स्वीकारली नाहीत ते स्थितप्रज्ञ राहिले. व्यासपीठावर येऊन देणगी नाकारीत ते म्हणाले.— 'आमची सरकारने एवढीच किंमत करावी ना? ह्या चार पैशासाठी का आम्ही स्वातंत्र्य सैनिकाचा खडतर मार्ग स्वीकारला होता?'

मला आता राहावले नाही. मी म्हटले—

'म्हणजे? त्यांनी आताही असेच खितपत जीवन कंठावं? शेवटच्या दिवसात त्यांना सरकारकडून थोडा दिलासा मिळाला म्हणून कुठे बिघडले? त्यांचा शेवटही खडतर अवस्थेतच व्हावा असे का तुम्हाला म्हणायचे आहे?'

—अर्थातच! त्यांनी जीवनभर जो बाणेदारपणा दाखवला तोच अखेरपर्यंत कायम ठेवायला हवा. इतरासाठी आदर्श बनायला हवे. समाजात काही माणसे अशीच हवी असतात. त्यांनी नंदादीपासारखे जगायचे असते.

हे शब्द ऐकून मला मोठा विस्मय वाटला. यावेळपर्यंत भाऊंच्या कपातली कॉफी संपली. ते एकदम उठले आणि त्यांनी निरोप घेतला. त्यांचे अस्तित्त्व पुसल्यावरही त्यांचे विचार घरात घुमत राहिले.

● ● ●

# सत्यशोधक की ? सिध्दसाधक

## वडखळ नाका ना. अंतुले आणि गवयांची सत्यशोधन (!) समिती

लेखक
ॲडव्होकेट
दत्ता पाटील
अलिबाग

१९ जानेवारी १९७४

५ जूनचे वडखळचे अंतुले प्रकरण जेवढे दडवण्याचा प्रयत्न केला गेला तेवढेच ते जास्त गाजले, प्रसिद्धीला आले. हे प्रकरण दडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाच जाहीर सभा घ्याव्या लागल्या. त्या सभेला उत्तर देण्यासाठी पेण येथे ताबडतोब दुसऱ्याच दिवशी तेवढीच मोठी जाहीर सभा होऊन तिला प्रत्युत्तर मिळाले.

त्यानंतर नुकत्याच संपलेल्या लोकसभेच्या अधिवेशनात नामदार गणेशांनी आपला पूर्वीचा सूर बदलून स्मगलिंगच्या प्रकरणात नामदार अंतुल्यांचा काही संबंध नाही; त्यांच्या शरीररक्षकांनी कस्टम अधिकाऱ्याला मारले या बाबतीत त्यांचा काही संबंध पोहोचतो का याबाबत C. B. I. ने चौकशी करायची की नाही, याचा विचार चालू आहे असे उत्तर देऊन अंतुल्यांचा गणेशांच्यावर असलेला राग कमी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतोय! १ सप्टेंबर १९७३ ला याच ना. गणेशांनी या प्रकरणात 'मंत्र्याची मोटार किंवा ती भरधाव गेलेली मोटार चोरटा व्यापार करणाऱ्या काफिल्याचीच होती किंवा नाही याबाबतची माहिती सरकारपाशी नाही' असे उत्तर दिले होते; या गोष्टीकडे खरेखुरे सत्यशोधन करणाऱ्याला कानाडोळा करता येणार नाही.

याच काळात (नोव्हेंबर १९७३ च्या सुमारास) गवई समिती नेमविण्यात आली. त्यावेळी ही समिती कोणी, कशी नेमली याबाबतीत सामान्य माणसाला काहीच कळू शकत नाही. एके दिवशी

(७ नोव्हेंबर १९७३ ला) गवई काही आमदारांना घेऊन अलिबागच्या डाक बंगल्यात येतात, कलेक्टर ऑफिसशी चर्चा करतात, आ. भगत व खानविलकर यांना भेटतात, वडखळ नाक्याला भेट देतात व निघून जातात,

परत असेच येतात, येण्याच्या अगोदर आदल्या रात्री बारा वाजता कलेक्टरमार्फत नवकृषिवलच्या प्रभाकर पाटलांना तार करतात व आमचेपुढे या म्हणून सांगतात. जणू काय प्रभाकर पाटील गवयांच्या गाण्याचे आमंत्रण कधी येते याचीच वाट बघत बसलेले असतात! त्यांना दुसरी काही कामेच नसतात! ज्याच्याकडे चौकशी करायची त्यांना आगाऊ वेळेवर कळवायची जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीवच या समितीला नव्हती. प्रभाकर पाटलांनी ता. २३–११–७३ च्या नवकृषिवलमध्ये याबाबतीत पुढीलप्रमाणे पत्रक प्रसिद्ध केले होते–

'गवयाची मैफिल असली म्हणजे ताल, ठेका सहसा चुकत नाही; परंतु ना. गवई साहेबांची ही मैफिल सुरुवातीपासूनच बदसूराची दिसत आहे. गवईसाहेब अलिबागेत येऊन गेले. वडखळला धावती भेट देऊन गेले. पण ज्या पोलीस स्टेशनमध्ये कस्टम इन्स्पेक्टर जवळकर यांना डांबून ठेवण्यात आले होते त्या पेण पोलीस स्टेशनला चौकशी समिती गेली नाही. त्यावेळी ड्यूटीवर असलेल्या पेणच्या फौजदाराला चौकशी समिती भेटली नाही. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे कस्टमचे जे काही अधिकारी व कर्मचारी घटनेच्या वेळी वडखळला होते त्यांचे जाब-जबाब या समितीने घेतलेले नाहीत. २२ तारखेला नागपूर येथे पत्रकारांना माहिती देऊन, एकीकडे चौकशीचे काम पूर्ण झाले आहे असे गवई घोषित करतात आणि दुसरीकडे ता. २४ रोजी या प्रकरणी सत्यशोधनार्थ मुंबई येथे मला भेटा व चौकशीचे कामी मला सहाय्य करा असे मला लेखी पत्राने कळवितात. या गवई चौकशी समितीवर माझा विश्वास नाही. गवईसाहेब जरी रिपब्लिकन पक्षाचे–विरोधी पक्षाचे असले तरी सत्ताधारी काँग्रेस पक्षाला अडचणीत टाकणाऱ्या त्यांच्या चुका सडेतोड मांडण्याचे धैर्य त्यांच्याजवळ नाही ही गोष्ट एकवेळ त्यांची माफी मागून नाईलाजाने मला सांगावी लागत आहे.

गवईसाहेब अशीच चौकशी इस्लामपूर गोळीबार प्रकरणी आपण केली होतीत. तिचा अहवाल अजून आपण प्रसिद्ध केला नाही, करू शकला नाहीत. कारण काँग्रेस सरकार दोषी आहे असे सांगण्याचे धैर्य तुमच्याजवळ नसावे. इस्लामपूर गोळीबार चौकशीचा रिपोर्ट गवईसाहेब, तुम्ही दोन वर्षे पुरी होत आली तरी करीत नाही आणि चटावरच्या श्राद्धासारखी कार्य करणारी तुमची ही अंतुले चौकशी समिती एक महिन्याच्या आत अहवाल सादर करणार आहे. बरोबरच आहे, वडखळ प्रकरणामुळे जनमानसात डागाळलेली ना. अंतुले यांची प्रतिमा येनकेन प्रकारे थोडीबहुत तरी उजळ करू इच्छिणारी तुमची

समिती आहे; सत्य शोधू नव्हे ! चौकशी समिती नव्हे, अंतुले पावन समिती हेच तुमच्या समितीचे खरे नाव ! दीड-दोन वर्षांत इस्लामपूरचा अहवाल सादर करू न शकलेल्या आणि एक महिन्यात वडखळचा अहवाल सादर करू पाहणाऱ्या आपल्या या झटपट रंगारी समितीपुढे निवेदन देण्याची म्हणूनच माझी इच्छा नाही. विधानसभेच्या लोकनियुक्त सदस्यांची खरीखुरी प्रातिनिधीक अशी तुमची समिती नाही.'

याच्या उलट नामदार अंतुल्यांकडून सर्व सहकार्य मिळत असल्यामुळे व जवळजवळ त्यांच्याच सल्ल्याने कार्यक्रम ठरत असल्यासारखा दिसत असल्यामुळे म्हणा, जिल्ह्यातील झाडून सर्व कडक कांजीचे खादीधारी झब्बेवाल्यांची जत्राच गवईच्यासमोर गाण्याच्या कार्यक्रमासाठी ता. १७ नोव्हेंबर १९७३ रोजी जमलेली दिसत होती. या सर्वांमध्ये एक सिद्धसाधकपणा असल्याचा भास उघड उघड होत होता आणि आता युसूफ हाफिज यांच्या सौजन्याने प्रसिद्ध झालेल्या या समितीच्या रिपोर्टाने तो जवळ जवळ सिद्ध झालेला आहे.

### गवई समितीची स्थापना

ही स्थापनाच संशयास्पद किंवा आगाऊ ठरलेली दिसत आहे. पुण्याचे आमदार प्रधान गुरुजी ४ नोव्हेंबरला मुंबईच्या गवयांना पत्र लिहितात. ते त्यांना मिळायला कमीत कमी एक दिवस लागला असे आपण धरायचे का ? परंतु कंधारला हजारो मैलावर असणारे केशव बुवा भोडगे यांचा समावेश या समितीत होतो कधी, त्यांना कळविले जाते कधी याचा आपल्याला काहीच पत्ता लागत नाही. पण एक गोष्ट कळते ती म्हणजे ७ नोव्हेंबरला सकाळी आमदार निवास मुंबई येथून ही मंडळी अलिबागला येतात. हे सर्व वायरलेसवरून ठरले का टेलिपथीने हे कळणे सामान्य माणसाच्या कुवती बाहेरचे आहे. ४ नोव्हेंबरचे प्रधान गुरुजींचे पत्र गवयांना कधी मिळाले ? गवयांनी समितीवर काम करावयास तयार आहात काय अशी पृच्छा कधी केली ? त्यांनी संमती कधी दिली ? व हे सर्व ठरून ३ दिवसात म्हणजे ७ नोव्हेंबरला समिती कामाला सुरुवात करते. म्हणून आगाऊच कोठे तरी शिजून ही समिती स्थापन करवून घेतली असा कोणाला संशय आला तर चुकेल काय ?

या समितीत घेतलेली माणसे ही कुठल्या कसोटीवर ठरवली, कोणी ठरविली ? हा प्रश्न भलताच ठरेल ! या समितीत अध्यक्ष धरून ४ जण विधान परिषदेचे सभासद व २ जण विधान सभेचे सभासद आहेत. हे असे का ? याला उत्तर मिळणार नाही. पक्षवार सभासदांची वाटणी कोणी केली ? वाटणी केली त्याला अशी वाटणी करण्याचा काय अधिकार ? हे सर्व प्रश्न अप्रस्तुत ठरतील. कारण यांची निवड एका विशिष्ट व्यक्तीकडूनच झालेली आहे.

विधानमंडळाच्या समितीवर घ्यावयाचे पक्षाचे प्रतिनिधी त्या प्रत्येक

पक्षाकडून नेमावयाचे संकेत असतात. पण या सर्व संकेतांचा भंग करून आपल्याला पाहिजे तीच मंडळी घेतली असे कोणी म्हटले तर त्याला काय उत्तर देणार ?

## समितीच्या कार्याची पद्धत

या समितीला कायदेशीरदृष्टचा काहीच आधार नव्हता. तिला कोणतीही Authority नव्हती. जबाब देणाऱ्या व्यक्तींना शपथ देण्याचा अधिकार नाही. शिवाय या समितीच्या काही सभासदांबद्दल अनुभव चांगला नाही. याच गवयांनी अशा एका समितीमार्फत इस्लामपूरच्या गोळीबाराची चौकशी केली परंतु वर्ष होऊन गेले तरी अजून अहवाल दिला नाही आणि या ठिकाणी भाऊगर्दीत एक महिन्याच्या आत अहवाल सादर केला.

समितीच्या चौकशीचा दृष्टिकोन मुळातच चुकीचा आहे. या सर्व प्रकरणात फिर्यादी कोण आहे याचा समितीने मुळी विचारच केलेला नाही. ज्या कस्टम इन्स्पेक्टर जवळकरांच्यामुळे हे सर्व रामायण उघडकीला आले त्या जवळकरांचा जबाब घेण्याची कोणतीच खटपट समितीने केलेली नाही.जवळकरांबरोबर असलेले चतुर्थ श्रेणीचे शिपाई, त्यांच्याकडे तपास केला का, तर रामा, शिवा, गोविंदा ! कमीत कमी ज्या पेण पोलीस स्टेशनमध्ये जवळकरांना डांबून ठेवण्यात आले होते त्या पेण पोलिस स्टेशनच्या फौजदाराचा जबाब, त्या पेण पोलीस स्टेशनची डायरी तरी मिळविण्याचा या समितीने प्रयत्न केला का ? गोष्टच बोलू नका. खादीचे झब्बेवाले व दारूचे परमीट मिळविण्यासाठी वशीला लावणारे यांचे जबाब मात्र अगत्याने घेतले (गवई समितीचा शेवटचा साक्षीदार अमरनाथ पाटील यांचा अलिबागला दारूच्या दुकानासाठी अर्ज असून तो मंजूर झाला असल्याचे समजते!) ज्या पेणच्या एक्साईज इन्स्पेक्टर श्री. रोडे यांच्याकडून जवळकरांना ओळखण्याचा कार्यक्रम करवून घेतला त्या रोडचांचा जबाब घेण्याची काही खटपट केली का ? पेण पोलिस स्टेशन समोरच असलेल्या जेलमधील एक त्यावेळचा कैदी रामा नारायण शेडगे, रा. ताडवाडी ता. मुरूड याचा जवाब का घेतला नाही ? हे सर्व प्रश्न अप्रस्तुत आहेत. यात कोणाला सिद्ध साधकपणाचा वास आला तर त्यात दोष कुणाचा ?

सोडून द्या ते प्रश्न. कमीत कमी समितीने ज्या काहीं कागदपत्रांची छाननी केली आहे ती तरी योग्य केली आहे का ? हे ही पाहाणे मोठे मनोरंजक होणार आहे.

१) कस्टम अधिकाऱ्यांचे जे अहवाल समितीने छाननीसाठी वापरले आहेत त्या अहवालात एक गोष्ट प्रामुख्याने सांगण्यात येते ती म्हणजे ५ जून १९७३ ला नामदार अंतुले ज्या गाडीत होते ती गाडी ॲम्ब्रॅसेडॉर असून तिचा नंबर ८४०४ होता.

आणि या अंतुले प्रकरणात मुंबईतील प्रत्येक वर्तमान पत्राकडे धाव घेऊन प्रसिद्धीस आलेला ड्रायव्हर

अब्दुलशकर इख्तियार हा ज्या गाडीवर ट्रायव्हर होता त्या जिल्हा परिषदेच्या गाडीचा नंबर आहे ७४९६ !

आता या ८४०४ नंबरच्या गाडीवरचा ड्रायव्हर कोण ? ही गाडी कोणाची ? याचाही तपास मनोरंजक आहे. ही ८४०४ नंबरची गाडी नामदार अंतुल्यांच्या सागरी बांधकाम खात्याची गाडी आहे. या गाडीवरच्या ड्रायव्हरचे नाव आहे पांडुरंग नारायण जाधव. सन ६९ ते ७१ च्या काळात हा ड्रायव्हर सागरी बांधकाम खात्याच्या ३७७६ नंबरच्या लॉरीवर ड्रायव्हर होता. त्या काळात या लॉरीमध्ये मांडवा बंदरात जवळ जवळ ५ लाख रुपये किंमतीच्या चोरट्या फिल्मस् व जर सापडली होती.

मग प्रश्न उभा राहतो; जर जवळकरांचे गाडीच्या बाबतीतले म्हणणे खरे धरले (आणि जवळकरांना त्यावेळी गाडीचा खोटा नंबर देण्याचे काहीच कारण नव्हते) तर नामदार अंतुले हे जिल्हा परिषदेच्या गाडीतून मी जात होतो असे खोटे का सांगतात ? याचा शोध करण्याचा थोडासा प्रयत्न गवई समितीने केला असता तर पुष्कळ गोष्टीवर उजेड पडला असता.

२ : बॅरिस्टर अंतुले यांचे शरीर रक्षक श्री. घोसाळकर यांच्या जबानीतील पहिलेच वाक्य पुढील प्रमाणे आहे 'आमची जीप वडखळ नाक्याजवळ पोचली तेव्हा काही कस्टमचे लोक आणि बाळकृष्ण पाटील बोलत होते' म्हणजे घोसाळकरांच्या म्हणण्याप्रमाणे तेथे जमलेले लोक 'कस्टमचे' होते हे त्यांना कळले होते. अशा परिस्थितीत जवळकरांची ओळख पटण्यासारखी परिस्थिती तिथे होती हे घोसाळकर कबूल करतात. मग अशी उघड उघड ओळख पटलेल्या एका जबाबदार अधिकाऱ्याला पेण पोलीस स्टेशनवर नेऊन डांबून ठेवण्यात 'अंतरः कोऽपि हेतू !' कोणता हे पोलीस ठाण्यावर जबरदस्तीचे नेणे व मागून गेलेल्या भरधाव गाडीचा जर कोणी संबंध जोडला तर चूक होईल काय ? शिवाय मंत्र्याची गाडी आहे. म्हणण्यापेक्षा गाडीत मंत्री आहे कळल्यावर गाडी जाऊ दिली असताना त्या अधिकाऱ्याशी बोलाचाली करण्याचे प्रयोजन काय ?

तसेच वडखळ नाक्यावर हे एवढे ओळख प्रकरणाचे रामायण घडले त्या बाबतीत मला काहीच माहीत नाही हा अंतुल्यांचा दावा समितीने तपासून पाहिला का ? कुलाबा जिल्ह्यातील सर्व साधारण मनुष्यच नव्हे तर कुठलाही जबाबदार सरकारी अधिकारी, की ज्या अधिकाऱ्यांना मंत्र्याच्या दौऱ्याची माहिती आहे, तो अंतुल्यांच्या या दाव्यावर विश्वास ठेवूच शकणार नाही. पण अंतुले असे का बोलतात ? त्यामुळे शंकेची पाल कोणाच्या मनात चुकचुकली तर दोष कोणाचा ?

३ : ५ जून १९७३ ला रात्री कस्टमच्या इंटेलिजन्सच्या बातमीप्रमाणे १४ ते १५ लाखाची चोरट्या घड्याळांची वाहतूक तिथून झाली की झाली नाही याचा तपास न करण्याची बुद्धीच

गवई समितीला का व्हावी ?

४ : अंतुल्यांचा दौऱ्याचा कार्यक्रम आयत्या वेळी का बदलला ? याला कारण खानविलकरांची 'गळ' सांगितली जाते. परंतु अगोदर मंजूर केलेला उद्घाटनाचा कार्यक्रम नाकारण्याचा प्रसंग कशामुळे उद्भवला याचा ऊहापोह कोठेच दिसत नाही. अंतुल्यांनी ६ तारखेला सकाळी बेलोशी हायस्कूलच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला संमती दिलेली होती. त्याप्रमाणे आमंत्रण पत्रिका छापल्या होत्या. तो कार्यक्रम कशामुळे बदलला गेला ?

जाता जाता एक गोष्ट मात्र सांगाविशी वाटते व ती म्हणजे स्मगलर्स लोकांचेही कार्यक्रमही आगाऊच ठरत असतात याची समितीने दखल घेतलेली नाही.

५ : बॅ. अंतुल्यांचे जे भाषण समितीने अहवालात दिलं आहे त्यात पुढील एक वाक्य आहे. 'अध्यक्ष महाराज, ४ वर्षांपूर्वी ह्या सदनामध्येही मी हे म्हणालो होतो.' म्हणजे २६ मार्च १९७० रोजी. आता या समितीला अंतुले ४ वर्षांपूर्वी काय बोलले होते हे पाहण्याची बुद्धी का सुचली नाही ? विशेषतः ४ वर्षांपूर्वीचे त्यांचे भाषण 'सत्यशोधनाचा पाठपुरावा' या पुस्तिकेत छापण्यात आले होते. जिल्ह्यात त्या भाषणाबाबत सतत चर्चा चालू होती. ते भाषण जर पाहिले तर नामदार अंतुल्यांच्यावर पां. रा. सानपांसारख्या एका जबाबदार सभासदांनी केलेले आक्षेप अंतुल्यांनी स्वच्छ शब्दात नाकारलेले नाहीत असे समितीला आढळून आले असते. परंतु भाऊगर्दीत समितीजवळ तेवढा वेळ नव्हता.

अंतुल्यांनी सोन्याच्या चालवलेल्या केसचे कागदपत्र जर समितीने पाहिले असते तर स्मगलर्सच्या दोन टोळ्यांपैकी एका टोळीचे वकीलपत्र त्यांच्याकडे होते असेही समितीला आढळून आले असते.

मंत्र्यांच्याभोवती असलेला बंदोबस्त स्मगलिंगसारखे कृत्य करावयास पोषक नाही असा भाबडा शोध गवयांनी या अहवालात लावलेला आहे. या ठिकाणी कृषिवलचे संपादक प्रभाकर पाटील यांनी पुरवठा अधिकाऱ्यांना फोन करून एका मंत्र्याच्या गाडीतील बेकायदेशीर तांदुळाची वाहतूक थांबविली होती एवढेच मी सांगतो. तेव्हा अशा भाबडया निष्कर्षाच्या आधारे लिहिलेला हा अहवाल अगदीच टाकाऊ (का फालतू ?) आहे असे जर म्हटले तर काहीच चूक होणार नाही.

हा विषय इथे संपवीत असताना अंतुल्यांच्या मित्रानी त्यांना जो सल्ला दिलेला आहे तो मात्र उधृत केल्याशिवाय मला राहवत नाही.

या प्रकरणात सुरुवातीपासून अंतुले यांची तरफदारी करणारे अनिरुद्ध पुनर्वसू पुढीलप्रमाणे म्हणतात, 'ह्या प्रकरणातून गवई समितीने बॅ. अंतुले यांना निर्दोष ठरवले म्हणून अंतुले यांनी सत्कार करून घ्यावेत हेही मला पसंत नाही. त्यांच्या अनुयायांना साहेबांचा सत्कार करावा असे वाटणे

स्वाभाविक आहे पण अशा सत्कारांनी अंतुले यांची प्रतिमा उजळणार आहे असे नाही. ती उजळायची असेल तर जे किटाळ त्यांच्यावर आणले गेले होते ते किटाळ आणण्यासारखी जी परिस्थिती आहे ती नष्ट करण्यासाठीच बॅ. अंतुले यांना प्रयत्नांची कोशीस करायला हवी. जंजिरा–मुरूड हा भाग अंतुले यांच्या पालकत्त्वाखाली आहे. या भागातून होणारा चोरटा व्यापार नष्ट करण्यासाठी कठोरपणे बॅ. अंतुले उभे होतील तेव्हाच जनसानसातील त्यांची प्रतिमा उजळेल आणि हा चोरटा व्यापार जेव्हा समूळ नष्ट होईल तेव्हाच बॅ. अंतुले हे सत्कार घेण्यास पात्र ठरतील. त्यांच्या सत्कार समारंभाने राजकारण साधेल हे निर्विवाद पण जोवर कुलाबा जिल्ह्यातून चोरटा व्यापार जोराने सुरू आहे तोवर बॅ. अंतुले यांच्या शिरावर टांगती तलवार आहे हे विसरून चालणार नाही.

बॅ. अंतुले यांचे अभिनंदन करताना ह्या धोक्याची नव्हे ह्या सत्यस्थितीची जाणीव त्यांना करून द्यायलाच हवी. नुसता टीकेचा गोविंदा नाचवून अथवा नुसते अभिनंदनाचे ढोल बडवून भागणार नाही. म्हणूनच अभिनंदनावरोबर हा सावधानतेचा इशाराही देणे भाग आहे.'

अनिरुद्ध पुनर्वसू यांचा हा सल्ला वाचीत असताना काकतालीय न्यायाने घडलेल्या काही गोष्टी वाचकांनी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. मध्यंतरी नामदार अंतुल्यांनी जिल्ह्यात व विशेषत: त्यांच्या मतदार संघात राज्याचे मुख्यमंत्री नामदार वसंतराव नाईक यांचा दौरा लावला होता. नामदार अंतुले त्यांच्या लवाजम्यासह त्यांच्या मतदार संघात होते आणि नेमके त्याच वेळी कस्टम खात्याला फार मोठे घबाड त्यांच्या मतदार संघात सापडले होते. त्याबद्दल नामदार अंतुले यांनी जाहीर खेदही व्यक्त केला होता आणि आज खास वकिली करणारे अंतुल्यांचे मित्र त्यावेळी कुत्सितपणे काही तरी बडबडत होते. म्हणूनच मला वाटते नामदार अंतुल्यांनी त्यांच्या सार्वजनिक आयुष्यात हा चोरटा व्यापार थांबविण्यासाठी काय काय प्रयत्न केले याचा एक अहवाल प्रसिद्ध करावा आणि त्यांच्या विरोधकांची तोंडे बंद करावीत. परंतु हे या जन्मी शक्य होईल काय ?

• • •


# पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

# सीमा भागातील मराठी भाषिकांच्या होरपळीची कहाणी

महादेव मोरे

२२ डिसेंबर १९७३ च्या 'माणूस'-मध्ये 'कोल्हापूर रविवार दि. ९' आणि 'मग बेळगावला उशीर का?' ह्या दोन लेखातील बऱ्याच चुकीच्या माहितीमुळे वाचकात गैरसमज होण्याची शक्यता आहे, म्हणून वस्तुस्थिती सांगणे, हे एक सीमावासीय म्हणून माझे कर्तव्य आहे. कुणाच्या सांगीवांगीवरून कोल्हापूरच्या दंगलीविषयी मराठी भाषिकांविरूद्ध गैरसमज निर्माण करणारा मजकूर लिहिण्यापूर्वी ती दंगल मुळात का नी कशी उद्‌भवली याचा मागोवा श्री. वासुदेव कुळकर्णी यांनी घेतला असता तर बरे झाले असते. कोल्हापूरला दंगल होण्यापूर्वी काही दिवस बेळगावात मराठी भाषिक जनतेवर अत्याचार करण्याचे सत्र सुरूच होते. पोलीस, एस्. आर. पी. व कानडी भाषिक लोक ह्यांची एकसंघ फळीच मराठी जनतेविरुद्ध उभी होती. (ह्या फळीला कर्नाटक सरकारचा वरदहस्त वा आशीर्वाद असावा, असा संशय नंतरच्या अथणी, मुधोळ, रबकई, पाच्छापूर, हत्तरगी, यरगट्टी, कित्तुर, हुबळी, हवेरी आदि ठिकाणी झालेल्या उद्रेकांवरून येतो!) कर्नाटक दिनाची मिरवणूक बेळगावातून काढून कानडी गुंडांनी जो हैदोसधुल्ला घातला, त्यावेळेपासून हे मारपिटीचे सत्र सुरू होते. ह्यात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणारे व त्यावेळेपासून समाजसेवा करणारे, खऱ्या अर्थाने लोकनेते श्री. बाबुराव ठाकूर जसे सुटले नाहीत, तसेच आमदार श्री. बळवंतराव सायनाकही सुटले नाहीत. कोल्हापूरच्या दै. 'पुढारी'तून ह्या अत्याचारासंबंधी सविस्तर वार्ता प्रसिद्ध होतच होत्या; त्यामुळे शहरातील वातावरण धुमसत होते; त्यात यल्लम्माला गेलेल्या कोल्हापूर भागातील यात्रेकरूंवरील अत्याचाराने ठिणगी पडली. यल्लम्माच्या डोंगरावर व पायथ्याशी असलेल्या सौंदत्ती गावाच्या एस. टी. स्टँडवर मराठी यात्रेकरूंना कन्नड लोकांनी शिव्या देत मारहाण केली; ते यात्रेकरू कोल्हापूरला परत आल्यावर आपल्यावरील अत्याचारांची कहाणी ढसाढसा रडत सांगताच कोल्हापूर पेटून उठले. ही अशी थोडक्यात पार्श्वभूमी आहे.... ह्या वातावरणाचा गुंडांनी फायदा घतला, अन् लूट सुरू केली. ह्यात हलगेकर देसाई, शिवलाल परदेशी आदि मराठी भाषिक लोकांच्याच

दारूच्या दुकानांची मोडतोड व लूट करून ती पेटवून देण्यात आली, ही वस्तुस्थिती. कोल्हापूरच्या दंगलीत गुंडांनी ज्यांचे अतोनात नुकसान केले ते सर्व लोक कारवार, निपाणी, बेळगाव ह्या महाराष्ट्र सीमा भागातीलच होते. काही कन्नड वेश्यांच्या व मजुरांच्या झोपड्याही ह्या दंगलीत पेटविल्या गेल्या. पण मराठी भाषिक लोकांपेक्षा कन्नड लोकांचे झालेले नुकसान अगदीच अल्प होते; आणि त्या खवळलेल्या जमावाच्या मानाने विचार केला तर तेव्हा पोलीस बंदोबस्त अगदीच अल्प होता. आणि जमावाला काबूत आणण्या-इतकी त्यांची संख्याही नव्हती. अन् तेव्हा पोलीस धावलेच असते तर त्यांचे मुडदे पडले असते, अशी परिस्थिती होती. एक उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर – लक्ष्मीपुरीतील परदेशी बंधूंच्या दारूच्या दुकानापुढे खवळलेला जमाव जमलेला असताना 'आम्ही मराठी भाषिकच आहोत. आम्ही संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात भाग घेऊन तुरुंगवासही पत्करला आहे,' ही सत्य परिस्थिती परदेशी बंधू सांगत असताना त्यांच्यावर जमावाने दगडफेक करून ते दुकान लुटून नंतर जाळलेच...सारांश कुणी कुणाचे ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत तेव्हा नव्हताच...

कोल्हापूरच्या दंगलीत सर्वस्व लुटले गेलेले हलगेकर कुटुंबीय आपल्या कार-मधून आपल्या गावी, बेळगावला, येण्यास निघाले. पण निपाणी शहरा-बाहेर सीमेवरच पोलिसांनी हलगेकर कुटुंबियांना अडविले. तो रविवार दि. ९ डिसेंबरचा रात्रीचा ८–९ चा समय. कोल्हापूरच्या दंगलीचे पडसाद निपाणीत उठून तंग वातावरण बनले होते. दगड-फेक व दंगलीचे किरकोळ प्रकार सुरू झाले होते. 'गावात दंगल सुरू आहे, आम्ही तुम्हाला पुढे जाऊ देणार नाही,' असे पोलिसांनी सांगितल्यावर हलगेकर कुटुंबियांनीही विचार केला, की निपाणीत एवढी दंगल सुरू आहे, तर बेळगावलाही ह्याहून अधिक दंगल सुरू झालेली असणार. तेव्हा अथणीलाच गेलेले बरे. अथणी तालुक्याचे दारू विक्रीचे सरकारी कंत्राट हलगेकर देसायांकडेच गेल्या काही वर्षांपासून असल्याने अथणीला त्यांचे गोडाऊन, ऑफीस तसेच रहाण्याचे घरही आहे. अथणीला जाण्याचा नेहमीचा रस्ता चिक्कोडीमार्गे; पण तेव्हा दंगलीचे लोण चिक्कोडीलाही पोहचल्याची वार्ता समजल्याने हलगेकर कुटुंबीय चिक्को-डीला वळसा घालून अक्कोल-नणंदीमार्गे अथणीला गेले...पण कन्नड दैनिकातील कोल्हापूर, सांगली, माधवनगर येथील उद्रेकांच्या अतिरंजीत वार्ता वाचून अथणीतील वातावरणही तंग झाले होते; त्याचा परिणाम म्हणून मंगळवार दि. ११ डिसेंबर रोजी तेथील कन्नड भाषिकांनी 'अथणी बंद'चा आदेश दिला. हुल्लडबाजी करीत, मराठी भाषिक लोकांच्या घरांवर दगडफेक करीत तेथील कॉलेज विद्यार्थ्यांनी गावा-तून मिरवणूक काढली. दुपारचा ११ चा समय होता...मिरवणुकीतील लोकांनी

हलगेकर देसाईंच्या गोडाऊनला व ऑफिसला घेरा घालून दगडफेक चालू केली. तसे श्री. रामराव हलगेकर (वय वर्षे ३८) ऑफीस बाहेर आले, आणि खवळलेल्या जमावाच्या पाया पडत कन्नडमध्ये म्हणाले, 'आमची काही चूक झाली असेल तर माफ करा... आम्ही कर्नाटकातले रहाणारे म्हणून कोल्हापुरातील आमची दुकाने लुटून जाळली. म्हणून आसऱ्याला आम्ही इकडे आलो. इथेही तुम्ही असे करायला लागल्यावर आम्ही कुठे जायचे? हे ऐकून जमाव शांत होऊन निघून गेला; तसे रामरावांनी आतल्या बायका मंडळींना व मुलांना गावात अन्यत्र हलविले आणि परत ते ऑफिसकडे आले...पण थोड्याच वेळात बाहेर परत जमाव जमला. तो काही तरी कट करून ह्या मराठी भाषिकाचा खातमा करायच्या उद्देशानेच. त्यावेळी ऑफीसमध्ये रामराव व त्यांचे लहान बंधू श्री. रमेश हलगेकर (वय २६) देखील होते...जमावाने ऑफीसच्या दारांना बाहेरून कड्या घालून आग लावून दिली; तसे बाजूच्या खिडकीतून गज वगैरे मोडून रामराव बाहेर पडले; पण मराठी भाषिकावरील संतापाने अंध झालेल्या जमावाने रामरावांना घेरून मारावयास सुरुवात केली. ते पाहून हाती बंदुक घेऊन त्यांचे लहान बंधू रमेश बाहेर आले. (हलगेकर देसाई बंदुकीचे लायन्सदार आहेत.) अन जमावाला पांगविण्यासाठी त्यांनी हवेत बार काढला. पण परिणाम उलटाच झाला. खवळलेला जमाव उलटा त्यांच्यावरच चालून आला. त्यांनी स्वसंरक्षणासाठी जमावावर गोळीबार केला; (त्यात एक जण ठार झाला.) त्या असंख्य लोकांपुढे एकट्या रमेशचे काय चालणार? अशा प्रकारे खवळलेल्या लोकांच्या गराड्यात रामराव व रमेश हे दोघे बंधू सापडले. आणि हाती गावेल त्या दगडांनी लोकांनी त्यांना ठेचून ठेचून क्रूरपणे ठार मारले...चेहरे तर ठेचून ठेचून इतके विद्रुप केले होते की, रामरावांच्या प्रेताची बुबुळे बाहेर पडून नाहीशी झाली होती, तर रमेशच्या प्रेताची बुबुळे बाहेर पडून लोंबत होती... इतकेही कमी झाले म्हणून की काय, तंगड्या धरून गल्लीगल्लीतून ती प्रेते फरफटत नेऊन त्यांची विटंबना लोकांनी केली...बेळगावला हलगेकर देसायांचे कापड दुकान आहे, तेथे दंगल सुरू होताच तेथील सर्व मूल्यवान कापडांचा स्टॉक सुरक्षिततेसाठी त्यांनी अथणीच्या आपल्या गोडाऊनमध्ये हलविला होता; तसेच कित्येक हजारांची रोख कॅशही त्यावेळी ऑफीसमध्ये होती...आगीत व लुटीत ते सर्व नाहीसे होऊन गेले; कोल्हापूर व अथणी येथील लुटालुटीत काही लाखांचा फटका बसून हलगेकर कुटुंबियांना आयुष्यामधून उठायची पाळी आली. तसेच त्यांच्या घरातील रामराव व रमेश हे दोन कर्ते पुरुषही दंगलीत बळी पडले...हलगेकरांच्या अरेरावीपणामुळे ते दंगलीचे बळी झाले, असे म्हणणाऱ्या व छापणाऱ्या महाभागानी एकदा इकडे येऊन सर्व परि-

स्थितीचे अवलोकन करून आपले मत बनवावे. दीड दोन लाखाचे एखाद्या तालुक्याचे सरकारी दारू विक्रीचे कंत्राट घेतल्यावर चोरून दारू गाळणाऱ्या हातभट्टीवाल्यांना जरब बसवावी लागते; तरच धंदा होतो, हे न समजलेल्यांनी आयुष्यात केवळ नोकरी करीत पाटया टाकल्या; धंदा केला नाही ! हातभट्टीवाल्यांना जरब बसविली नाही तर सरकारी दारू कुणीच विकत घेणार नाही; अन कंत्राटवाल्यांना स्वतःची घरेदारे विकून सरकारी हप्ते भागवावे लागतील...हाच अरेरावीपणा असेल तर शब्दांचे अर्थही बदलावे लागतील !

ह्यानंतर दोन दिवसांनी रबकईला झालेल्या दंगलीत कन्नड भाषिक जमावाने मांडवकर पातळांचे कारखानदार व उत्पादक श्री. शंकरराव मांडवकरांचाही वरीलप्रमाणेच दगडाने ठेचून ठेचून खून केला... त्यांचा बंगला, यंत्र माग कारखाना, मोटारी, स्कूटर्स सारं काही जाळून भस्म केले.

हलगेकर देसाई बंधु काय किंवा शंकरराव मांडवकर काय, ह्यांचे खून ते मराठी भाषिक होते म्हणून जसे झाले आहेत, तसेच ते अथणी व रबकई भागात सर्वांना वरचढ होते, त्यामुळे त्यांच्या उत्कर्षावर जळणारे रबकई, बैलहोंगल, अथणी भागातील व्यापारी व हातभट्टीवाले ह्यांनी दंगलीचा फायदा घेऊन ते तीन क्रूर खून घडवून आणले आहेत... हलगेकर देसाई व मांडवकर कुटुंबियांनी आजवर अनेक संस्थांना तसेच गोरगरिबांना, नडले अडलेल्यांना आजवर हजारो रुपयांची मदत केली आहे. रमेश हलगेकरांचा हात तर सदा खुलाच असायचा. आपल्या अनेक मित्रांना अडीअडचणीत त्यांनी हजारोंची मदत केली आहे. सर्व जाती धर्माची माणसे त्यांनी जोडली होती. ह्यात अण्णासाहेब अथणी, गुरूपाद वांद्रेसारखे कन्नड भाषी अनेक लोकही होते...आणि अशा माणसांच्या खुनाचे समर्थन करणे त्यांना अरेरावीपणा म्हणणे म्हणजे त्यांच्या मरणाची क्रूर चेष्ठा करण्यासारखे आहे.

रबकई-अथणीतील कन्नड भाषिकांची दंगल मुधोळ परिसरात पसरायला वेळ लागला नाही... त्यात सोमय्या साखर कारखाना जाळून भस्मसात करण्यात आला, आणि तेथे कामासाठी पंढरपूर, बार्शी, कुर्डूवाडी, परभणी, लातूर, बीड अदि महाराष्ट्रातील गावातून आलेल्या ८–१० हजार मराठे मजुरावर अमानुष अत्याचार करण्यात आले. आदल्याच दिवशी (म्हणजे दि. १३ डिसेंबर रोजी) झालेला त्यांचा पगार लुटला, त्यांच्या झोपड्या जाळल्या, आणि त्यांच्या स्त्रियांवर सामुदायिकरीत्या बलात्कार करण्यात आले. कारखान्यातील एका अधिकाऱ्याला तर खांबाला बांधून प्रत्यक्ष त्याच्या समोर त्याच्या पत्नीवर बलात्कार करण्यात आला. भागूबाई चिदकर, आंबुबाई मोहिते, बानुबाई चिचनूर, आंबुबाई माने अशा १२ ते ४० वयापर्यंतच्या अनेक बलात्कारित स्त्रिया असून त्यांतील १७ जणी अजूनीही बेपत्ता आहेत... कदाचित् त्यांचे खून झाले असतील, कदाचित् कर्नाटकातील

दूरच्या शहरातील वेश्यालयात त्यांची विक्रीही झाली असेल. ह्या स्त्रियावर जसे सामुदायिक बलात्कार झाले, तसेच त्यांना नंतर बेदम मारून कुत्र्यामांजरां-प्रमाणे तांगड्या धरून गरगर फिरवून फेकून देण्यात आले. बेळगावच्या शहापूर भागातील एका लग्नसमारंभात एस. आर. पी. वाले घुसले आणि पुरुषांना बेदम मारून स्त्रियांच्या पुढे आपल्या अंगावरील कपडे उतरून निर्लज्जपणे नग्न नाचून निघून गेले...

त्या आठवड्याभरात निपाणी-बंगलोर या हायवेच्या टापूत काय घडत होते? तर रोडवरील प्रत्येक गावात २–२, ३–३ हजारांचा बेभान जमाव जमून महाराष्ट्रीय रजिस्ट्रेशन असलेल्या ट्रक्सची व कार्सची लुटालूट करून जाहीर होळी करीत होता. ह्या लुटीत व जाळपोळीत पोलीस व एस. आर. पी. वालेही भाग घेत होते हे विशेष. निपाणी ते बंगलोर ह्या ४०० मैलांच्या टापूत ह्या वेळी ४९ ट्रक्सची नि डझनावारी टुरिंग्सची होळी करण्यात आलेली आहे. हुबळीपासून ४५ मैलांवर रोडवरच असलेल्या हवेरी गावात तर हलग्याशिणग्या लावून ट्रकांची गाबातून मिरवणूक काढून मग समारंभपूर्वक होळी करण्यात आली आहे. संकेश्वरला दै. 'पुढारी'ची पेपर टॅक्सी आणि हत्तरगीला महागावकरांची ॲम्बेसॅडर जाळण्यास पोलीस व एस. आर. पीं. नी मदतच केली आहे. हलगेकरांच्या जीप गाड्या ठिकठिकाणी जाळण्यात आल्या त्याही वरील जनतेच्या सेवकांच्या उपस्थितीतच... केवळ निपाणी बंगलोर रोडवरच नव्हे तर पाच्छापूर, हुक्केरी आदि रेल्वे स्टेशनावरही रेल्वे गाड्या अडवून मराठी माणसांची वेचून वेचून लूटमार करण्यात आली.

सारांश, पोलीस, एस. आर. पी. व कन्नड लोक ह्यांची एक संयुक्त आघाडीच मराठी माणसांना ठेचून नेस्तनाबूत करण्यासाठी सक्रीय प्रयत्न करीत होती...

२२ डिसेंबरच्या 'माणूस'मध्ये महाराष्ट्रीय लोकांची विकृत व चुकीची बाजू मांडणारे जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्याची ही दुसरी बाजू. श्री. सोमण ह्यांनी केवळ मुंबईतील कन्नड भाषिकांच्याच मुलाखती न घेता सीमा भागातील मराठी भाषिकांच्याही घेऊन मगच लेखणी उचलली तर ते जास्त न्याय्य ठरेल; तसेच 'नवसंदेश'मधील कुलकर्णींनी कोल्हापूरच्या पोलिसांच्या नावे बोटे मोडण्यापूर्वी वरील खून, बलात्कार, जाळपोळ व लुटालूट सीमा भागात झाली तेव्हा म्हैसूर पोलीस कसे वागले, त्याचाही थोडा विचार करावा! दंगलीत महाराष्ट्रीय पोलीस आपल्याच मराठी माणसांना कुत्र्यागत गोळ्या घालून ठार मारताना आम्ही पहातो, उलट म्हैसुरी पोलीस मात्र आपल्या कन्नड लोकांना अशा दंगलीत खांद्याला खांदा लावून मदत करीत असल्याचे दृश्य दिसते...सीमा भागातील मराठी जनतेकडे संपूर्णपणे पाठ फिरवून दिल्लीकडे नजर लावलेले महाराष्ट्रीय शासन कुठे नि आपल्या लोकांना पाठीशी

घालून बेमुर्वतपणे दिल्लीपुढे उभे ठाकणारे म्हैसुरी शासन कुठे! केवढा जमीनअस्मानाचा फरक!

'माणूस'च्या २२ डिसेंबरच्या मुखपृष्ठावर कोल्हापुरातील जळिताची छायाचित्रे प्रसिद्ध झाली तशीच अथणी-रवकई-मुधोळ- हुबळी-रामदुर्ग इ. ठिकाणी मराठी लोकांच्या वास्तूंची जाळपोळ करून त्यांना क्रूर मारहाण करीत ठार मारण्यात आले, त्याची छायाचित्रेही प्रसिद्ध केली तर ते समतोलपणाचे ठरेल. केवळ महाराष्ट्रातील दंगलींची अशी सचित्र वृत्ते देऊन उलट अजाणता कन्नड लोकांच्या हातात कोलीत दिल्यासारखेच होईल.

सीमा भाग गोव्याला जोडण्याची हुक्की पुण्याच्या 'तरुण भारत'कारांसारख्या पत्रकारांप्रमाणे श्री. सोमण ह्यांनाही आलेली दिसते; हे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. ह्यामध्ये सीमा भागातील बहुसंख्य मराठी लोकांच्या मनाचा कुणी विचारच करीत नाही, जणू ती मुकी मेंढरे. कुणी म्हणते, इकडे ढकला; कुणी म्हणते, तिकडे कोंबा! पण ह्या सीमा भागाचे, विशेषत: निपाणी-बेळगावचे पूर्वापार संबंध महाराष्ट्राशी निगडीत आहेत; आणि गेली अनेक वर्षे आम्ही सीमावासीय सनदशीर मार्गाने आंदोलन करीत आहोत ते महाराष्ट्रात जाण्यासाठी, गोव्यात जाण्यासाठी म्हणून नव्हे! पुण्या-मुंबईत बसून ते लिहिणे फार सोपे आहे; पण सीमा भागात राहून ते भोगणे किती कठीण आहे!

तर सीमा भागात जे घडले त्याची ही दुसरी बाजू. पुण्या-मुंबईच्या दैनिकात हे सर्व सविस्तर प्रसिद्ध केले गेले नाही; निदान 'माणूस' तरी ही सर्व शब्दश: सत्य परिस्थिती प्रसिद्ध करून सीमा भागातील मराठी जनता कोणत्या आगीत होरपळते आहे ते आपल्या असंख्य वाचकांना दाखवून देईल, ह्या आशेने हा सर्व प्रपंच केला आहे. वास्तविक पुण्या-मुंबईच्या दैनिकांनी आपले खास प्रतिनिधी पाठवून सीमा भागातील उद्रेकात मराठी माणसाची कशी होरपळ झाली नि होते आहे ह्यांची वार्तापत्रे सातत्याने प्रसिद्ध करून तमाम महाराष्ट्रीयांपुढे सत्यचित्रे उभी करून सहानुभूतीचे वातावरण तयार करायला हवे होते. पण बांगला देशाला खास प्रतिनिधी पाठवून वार्तापत्रे देण्याचा सावधपणा दाखविणारे मराठी नियतकालिकांचे संपादक सीमा भागात बांगला देशासारखेच माणुसकीला काळिमा फासणारे अत्याचार घडत असताना त्यांची दखल घेण्याची साधी आपुलकीसुद्धा दाखवीत नाहीत! दलित स्त्रियांवर अत्याचार घडताच आरडाओरडा करून पुण्या-मुंबईतील गल्ली-बोळ नि रस्ते दणाणून सोडणारे विविध पक्षातील व संघटनातील पुढारी सीमा भागात झालेल्या स्त्रियांवरील बलात्काराबाबत मात्र अजूनही मूग गिळून आहेत. म्हणजे महाराष्ट्रातील सत्तारूढ मराठा नेतृत्वाविरुद्ध फळी उभारण्यासाठीच केवळ ह्यांना दलितांबद्दल आपलेपणा वाटतो,

असे समजावयाचे का? मग सीमा भागातील अनेक मराठी स्त्रियांवर जे बलात्कार झाले, त्याबद्दल त्या संघटना न् त्यांचे वाचाळ पुढारी अजूनही गप्प कसे आहेत? दलितांवरील अत्याचारांचे जसे सत्तारूढ मराठा नेतृत्वाविरुद्ध भांडवल करता येते, तसे ह्याबाबत होणे नाही, म्हणून ते वाचाळवीर मुकाट आहेत का?

आणि आपले मराठी साहित्यिक? 'सखाराम बायंडर' विरुद्ध उलटसुलट काहूर माजविण्यास त्यांना सवड असते; पण सीमा भागातील ह्या अत्याचारां-विरुद्ध कुणी अजून लेखणी उचललेली दिसत नाही! सत्तारूढ पक्षाचा ह्या ना त्या कारणावरून मिंधेपणा पत्करलेल्या बोरूबहाद्दरांकडून तशी अपेक्षा करणे नाहीतरी चूकच आहे!

अन् आपल्या पंतप्रधान माताजी? त्यांच्याबद्दल तर काय लिहावे? उलट त्या सीमावासीयांनाच धमक्या देतात– 'रस्त्यावर येऊन प्रश्न सुटणार नाही! कुणाच्या दबावाने मी निर्णय घेणार नाही!!' वगैरे...येथे कोण रस्त्यावर आलेय्, कोण दबाव टाकताहेत नि का, कशाबद्दल–हे विचारातच न घेता सीमावासीयांना धमकावण्या सुरू! येथे त्यांच्या पिताजींची आठवणही व्हावी; संयुक्त महाराष्ट्राच्या आंदो-लनाच्या वेळी त्यांनी महाराष्ट्रीयांवर अशाच अज्ञानातून मुक्ताफळे उधळीत धमकावणीवजा वक्तव्य केले होते– 'परदेशात असे घडते तर तोफाही आणल्या असत्या!' म्हणजे त्यावेळी मुरारजीने बंदुका वापरल्या ते मराठी माणसांवर थोर उपकारच केले! जे भारत–पाकिस्तानच्या विभाजनाच्या वेळी घडले, जे बांगला देशाच्या मुक्तीच्या वेळी घडले; तसेच ह्या सीमाभागातही घडत आहे. पोलीस, एस. आर. पी. व कन्नड लोक ह्यांनी पद्धतशीरपणे संयुक्त आघाडी उघडून सीमावासीय मराठी भाषिकांना महा-राष्ट्रात हुसकावून, पळवून लावण्यासाठी कसे क्रूर अत्याचार करण्यात येताहेत; हे सत्तेने उन्मत्त झालेल्या दिल्लीला दिसत नाही! वर आणखी उपदेशाचा डोस– 'शांतता राखा, मग विचार करू!' जणू गेली १७ वर्षे शांतता नव्हतीच–ह्यांना सीमाप्रश्न सोडवा-यला! आणि आता तर केवळ सगळयांना स्वतःच्या खुर्च्या सांभाळा-यची काळजी. नाईकांना आपली, अर्सना आपली. आणि दिल्लीच्या माताजींना तर कर्नाटकातील नवकाँग्रेसच्या प्रतिमेची काळजी! सीमाप्रश्न सोडवून मराठी माणसांना न्याय देऊन त्यांना त्या प्रतिमेला धक्का द्यावयाचा नाही आहे! सीमाप्रश्न सोडविण्याची आत्मी-यता जिथे महाराष्ट्रातील सत्तारूढ मराठी नेतृत्वालाच वाटत नाही, तेथे दिल्लीचे काय म्हणा! नाहीतर मराठी नेत्यांनी मनात आणले असते तर ह्यापूर्वी केव्हाच हा प्रश्न सुटला नसता काय? अशा नेभळ्या महाराष्ट्रीय नेतृत्वाची कर्नाटकातील बेडर नेतृत्वा-बरोबर आम्हा सीमावासीयांना तुलना करण्याची पाळी यावी, हे आमचे दुर्दैव!!

● ● ●

## पुस्तक परीक्षण

# रेणू

'रेणू' ही पु. शि. रेगे यांची नवी कादंबरी, खूप अपेक्षा निर्माण करणारी. विशेषत: 'सावित्री'च्या पार्श्वभूमीवर तर अधिकच. या कादंबरीतील तपशील विशिष्ट स्थलकालाशी संबद्ध आहे. १९६५ चा सुमार, पाकिस्तानचे युद्ध, दिल्लीतील विविध मंत्रालयांशी संबंधित व्यक्ती. त्यांमध्ये विदेश मंत्रालयात संयुक्त सचीव म्हणून काम करणारे आय. सी. एस. अधिकारी चौधरी आहेत. चित्र, शिल्प, कृषि-विज्ञान, काव्य इत्यादी अनेक विषयात तज्ज्ञ असलेला देखणा, तरतरीत असा गेब्रिएल लोरेंझा आहे. वृत्तीने मन-मोकळी, बडबडी, आवाहक डोळ्यांची, ड्रामा-आर्ट क्रिटिक असणारी जानकी रंगनाथन् आहे. शरीरा पलिकडचे मन जाणणारी, समधात भूमिकेत असणारी, भजनवेडी पूर्णिमा आहे. एकाचवेळी कॉकेशीअन चॉकसर्कल आणि मृच्छ-कटिक अशा दोन्ही प्रकारची नाटके जाणिवेने सादर करणारा, जीवन व्यव-साय आणि खाजगी जीवन कटाक्षाने बाजूला ठेवणारा नाटयवेडा अबू हसन आहे. या व्यतिरिक्त चौधरींची पत्नी प्रमिला, स्वामी अनित्यजी, रांदेरिया, इत्यादी आणखीही काही व्यक्ती आहेत. या साऱ्या परिसरात रेणूही आहे.

भिडस्त, देखणी, आटोपशीर अशी रेणू नोकरीच्या शोधासाठी दिल्लीला आली. चौधरींच्या पत्नीची ती भाची. चौधरींबरोबर निरनिराळ्या पार्टयांना जाण्यामुळे अनेकांचा तिचा परिचय. तो परिचय वाढत गेला. नोकरी आणि कलात्मक गुणांमुळे नवनवीन संधी मिळत गेली. परदेशी जाऊन यणे झाले. चौधरी, लोरेंझा, अबू हसन या तिघांनी तिचे भावविश्व व्यापले. रेणूसाठी अबू हसनने मृच्छकटिक नाटकाच्या तारखा पुढे ढकलल्या. ती दिल्लीत नसताना प्रयोग होणे योग्य नव्हे, असे त्याला वाटत होते. तर चौधरींची रेणूविषयक भूमिका बरेच दिवस निश्चित होत नव्हती. रेणूचे न्यूयॉर्कचे वास्तव्य आणि चौधरींच्या यू. नो. बैठकीच्या तारखा एकत्र आल्याने त्यांच्या मनातील द्वंद्वाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. एका क्षणाला लौकिक नात्याचे भान हरपले गेले. रेणूच्या वागणुकीतील मोकळेपण आणि अलिप्तपण यांचे एक विलक्षण मिश्रण होते, त्याची संगती लोरेंझाला कधीच लागत नव्हती. रेणू या परि-वारात हरवून जात होती. ती सर्वांची होतीही आणि नव्हतीही ! तिला जाण-वत होते की, इतकी माणसे आपल्या भोवती गर्दी करून आपल्या जगात येत आहेत, त्यातल्या प्रत्येकाबरोबर आपले स्वत:चे असे काही हरवले जात आहे.

पण या परिसरात तिचे हरवून जाणे तितक्या जाणिवेने कादंबरीत व्यक्त झाले नाही. तिच्या भावविश्वातील अनेक स्पंदने अधुरी, अस्पष्ट राहिली. तिच्या भावविश्वाला एक निश्चित आकार लाभला नाही. याचे कारण जाणवले ते असे, की रेगे यांच्या मनात रेणू ही व्यक्तिरेखा केंद्रभूत असूनही प्रत्यक्ष लेखनात मात्र तिच्या व्यक्तिरेखनातले अनेक रंग फिकट राहिले. लोरेंझा, चौधरी, अबूहसन, अनित्यजी, पूर्णिमा, जानकी इत्यादी भिन्न भिन्न व्यक्तिरेखांना आकार देता देता रेणूचे महत्त्व उणावले. त्या परिसरात एक रेणू दाखवली गेली एवढेच. तो परिसर किंवा परिवार आणि रेणू यांचे एकजीवत्व व्यक्त करता करताच रेणूचे भावविश्व अधिक गडद होणे महत्त्वाचे होते, पण तसे घडले नाही. रेणूपेक्षा तिथला परिसर, माणसे अधिक लक्षवेधी ठरली.

दिल्लीमधील एका विशिष्ट वर्गाची राहणी, जीवनदृष्टी, स्त्री-पुरुष संबंध अशा काही गोष्टींचे दर्शन रेग्यांना मोठ्या प्रमाणात अभिप्रेत दिसते. समाजातल्या एका विशिष्ट थराचे जीवनदर्शन हा कादंबरीचा विषय जरूर होऊ शकतो. परंतु रेग्यांसारख्या मानवी जीवनातील स्पंदने सूक्ष्मतेने जाणणाऱ्या लेखकाला तेवढेच अभिप्रेत असेल असे वाटत नाही. व्यक्तिरेखनाच्या संदर्भातील आणि तपशीलाच्या मांडणीतील आघातच चुकला की काय अशी शंका कादंबरी वाचल्यावर येते. रेणूच्या जीवनातील जो आशय व्यक्त करायचा प्रयत्न आहे, त्या आशयाला वेढून घेताना कादंबरी माध्यमाच्या सर्व अंतर्गत शक्ती पणाला लागल्या आहेत, असेही वाटत नाही.

समाजाच्या एका विशिष्ट थरामध्ये स्त्री-पुरुष नात्यासंबंधीची जाणीव कादंबरीकारांनी व्यक्त करण्याचा यत्न अलीकडच्या काही वर्षांत केला आहे. स्त्री-पुरुष संबंधातील ही जाणीव वास्तव, प्रगल्भ आणि स्निग्ध स्वरूपाची आहे. त्या जाणीवेचा शोध सूक्ष्मतेने आणि सावधतेने घेण्याचा प्रयत्न स्वत: रेगे यांनीच 'सावित्री' मध्ये केलेला आहे. 'सावित्री'तील त्यांची अभिव्यक्ती कलात्मक पातळीवर यशस्वी झालेली आहे. 'सावित्री'मध्ये त्यांना वास्तव जीवनाचे भान आहे. पण ते त्या वास्तव जीवनातील तपशिलात गुंतून राहिले नाहीत. ते सारे तपशील साह्यभूत करून घेऊन त्यांनी शाश्वत जीवनातील कोमल भावना आणि जीवनाच्या विकासाचा अनुभव घेणारी, Experience and growth या दिशेने जीवनार्थ शोधणारी अशी एक सावित्री निर्माण केली. आपणही 'सावित्री' बरोबर जीवनार्थाचा शोध घेण्यासाठी उत्सुक झालो, तिच्याबरोबर पुढे पुढे गेलो. तसा अनुभव 'रेणू' देऊ शकली नाही. दिल्ली आणि परिसर या वास्तव जीवनातल्या तपशीलात ही कादंबरी रमली. त्या वास्तवाला छेद देऊन रेणूच्या अनुभूतीचे क्षेत्र रूंदावले नाही. त्यातून शाश्वत जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला नाही. स्वतंत्रपणे त्यातली

प्रत्येक व्यक्तिरेखा चांगली वाढूनही आवश्यक तो एकसंध परिणाम ही कादंबरी साधू शकली नाही.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख आवश्यक वाटतो. रेगे यांनी कादंबरीत अनेक ठिकाणी इंग्रजी शब्दांचे आणि वाक्यांचे भाषांतर दिले आहे ते कशासाठी? एकतर मराठी वाक्यांमध्ये येणारे इंग्रजी शब्द हे त्या त्या व्यक्तिरेखेच्या व्यक्तित्वाचा एक भाग म्हणून यायला हवेत. आणि ते जेव्हा तसे येतात तेव्हा त्याचा मराठी तर्जुमा (तळटीपेत) देण्याचे प्रयोजनच उरत नाही. रेग्यांच्या कादंबरीचा वाचक हा आता निश्चित झालेला आहे. त्या वाचकाला किमान एवढे इंग्रजी तरी कळत असणारच, असे वाटते. यापेक्षा अन्य काही हेतू असल्यास न कळे!

**— वि. भा. देशपांडे**

रेणू
पु. शि. रेगे,
मौज प्रकाशन, मुंबई
किंमत सहा रुपये ¤

# वस्ती वाढते आहे

## एका सामाजिक समस्येचे तटस्थपणे केलेले चित्रण

डॉ. भा. ल. पाटील हे सेवादलाचे एक सैनिक. समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक. त्यांनी स्वत: कादंबरीच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे 'राजकारणाच्या भाऊगर्दीत परकं परकं वाटू लागलं. समाज सेवेच्या बदललेल्या नवीन लखलखीत मुशीत सेवादलाच्या संस्कारांनी घट्ट झालेल्या सोवळ्या ध्येयवादाचा साचा काही केल्या जुळेना. सदुसष्ट साली राजकारणातून अंग काढून घेतल्यानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी मी परत लेखनाकडे वळलो. ज्या कारणामुळे व्यथित होऊन 'आता राजकारण आणि त्या अनुषंगाने येणारी समाजसेवा हे आपले प्रांत राहिले नाहीत' असे वाटू लागले ते कारण मन वेळीअवेळी उदास करीत राहिले त्यातून विरंगुळा मिळावा म्हणून काहीतरी लिहीत गेलो.'

त्यांचे हे मनोगत जाणून घेण्याचे कारण म्हणजे या कादंबरीच्या — या विषयाच्या संदर्भात त्याला विशेष महत्त्व आहे. समाजसेवक म्हणून त्यांचा या सतत वाढणाऱ्या 'वस्तीशी' दैनंदिन आणि प्रत्यक्ष संबंध आलेला आहे. या 'वस्तीची' निरलसपणे आणि निरपेक्षबुद्धीने सेवा करण्याची त्यांची तीव्र इच्छा आजच्या गढूळ झालेल्या राजकीय प्रवाहामुळे पूर्ण करता आली नाही. त्यांना वाटणारी ही खंत, ही बोच त्यांनी आपल्या लेखणीद्वारे वस्तीचे दर्शन घडविल्यामुळे किमान बोथट झाली आहे.

### प्रत्यक्ष अनुभूती

साहित्य निर्मिती असो किंवा कला निर्मिती असो लेखकाला किंवा कलावंताला 'प्रत्यक्षानुभूती' असल्यास त्याची कलाकृती सजीव, चित्तवेधक

आणि प्रमाणबद्ध होते असे 'अनुभूतीचे' महत्त्व विशद करणाऱ्या विचारवंताना वाटते. यातील सत्य जाणून घेऊनसुद्धा असे म्हणता येईल की, त्या अनुभवाला 'प्रतिभा' आणि 'कलात्मकता' यांची संपूर्ण जोड असल्याशिवाय वाङमयीन पातळीवर त्याची मांडणी नीटशी करता येणार नाही. समृद्ध अनुभवामुळं एखाद्या व्यक्तीचा, वस्तूचा, समस्येचा, शोध–बोध घेता येईल. बारीक सारिक सारं टिपता येईल. अनेकविध सूक्ष्म कंगोरे न्याहाळता येतील, वेध घेता येईल. पण स्वतंत्र कलाकृती म्हणून उभी करताना ही शिदोरी अपुरी आहे याची वारंवार जाणीव ही कादंबरी वाचताना होते.

## उपेक्षित समाज

मानवी समाजाच्या प्रारंभापासून अनेक उपेक्षित घटक कसंबसं जीवन जगताहेत. नव्हे रेटताहेत. 'मरण येत नाही' म्हणून जीवन जगणारे अनेक समूह आहेत. काही घटक जगण्यासारखं काहीही नसतानासुद्धा केवळ जगण्याची जिद्द म्हणून तगून आहेत. श्रेष्ठ वर्ण, वर्ग, जाती यांनी नाडलेले, दूर लोटलेले, तिरस्कारलेले, छळलेले अनेक बिचारे मानवी समूह जीव जगवून आहेत. ज्यांच्या वाट्याला केवळ भीषण दारिद्र्य, अपमान, अपेक्षाभंग, अन्याय, रोगराई, आलेली आहे अशी असंख्य 'माणसं' 'पशुतुल्य' जीवन जगत आहेत, हालअपेष्टा भोगीत आहेत. यमयातना सहन करीत आहेत. नरकांत खिचपत पडलेले आहेत. महारोगी, क्षयी, कुंटणखान्यातील वेश्या, अंध, अपंग भिकारी, महार, मांग, चांभार, ढेड, – हे दलीत पीडीत समूह; बेवारशी आणि अनैतिक संबंधातून निर्माण झालेली प्रजा...अशी कितीतरी लांबलचक यादी करता येईल !

सुजाण अन् सुसंस्कृत माणसाची सहानुभूती, दया, प्रेम, सहकार्य उपेक्षिताना अजूनही पुरेशा प्रमाणात लाभलं नाही, लाभेल की नाही याची दाट शंका आहे. म्हणूनच कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणं

'मानवाच्या संस्कृतीची
काय लागे ही ध्वजा !
तीस कोटी दैवतांच्या
की दयेचे हेमढे ?'

## व्यापक सहानुभूती

काहीशा प्रमाणात निसर्ग निर्मित अन् बऱ्याचशा प्रमाणात मानव निर्मित या समाजाकडे लक्ष दिले आहे ते संतानी, प्रेषितानी, कार्यकर्त्यानी अन् कलावंतानी ! जीवनविषयक विशाल अन् व्यापक दृष्टीकोन, सहानुभूती अन् सहिष्णुता, मायेचा ओलावा लाभला पण अपवादात्मकच व्यक्तींचा ! साहित्याच्या क्षेत्रापुरता मर्यादित विचार करताना आधुनिक मराठी साहित्यात कै. श्री. म. माटे, साने गुरुजी, विभावरी शिरूरकर इत्यादींनी उपेक्षितांच्या अंतरंगाचा शोध घेतला. त्यांची वेदना शब्दबद्ध केली. अगदी अलीकडच्या काळात सर्वश्री बागूल, खरात, दळवी, कर्णिक, यांनी झोपडपट्टीचा विषय, उपेक्षितांचा विषय समर्थपणे हाताळला आहे. दळवी अन् कर्णिक यांच्या कादंबऱ्या कलाकृती म्हणून वरचढ आहेत

यात शंकाच नाही. पण माटे आणि सानेगुरुजी यांच्या परंपरेचा—प्रत्यक्ष सेवेतून साहित्य निर्मिताचा-वारसा बागूल खरातांप्रमाणे डॉ. भा. ल. पाटलानी उचललेला आहे यालाही असाधारण महत्त्व आहेच

ग्रामीण जीवनातील उपेक्षित समाज आणि शहरी जीवनातील उपेक्षित घटक यांचाही विचार 'साहित्य कलाकृती' म्हणून केला गेला आहे. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य, दुःख, अज्ञान, अंधश्रद्धा, रोगराई, त्याचप्रमाणे बेरकेपणा, सौंदर्य, माणुसकी, विनोद, चिवटपणा, शहाणपण यांचाही वेध व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील, सरोजनी बाबर, आनंद यादव, बोराडे इ. नी घेतला आहेच.

'उपेक्षित जीवन' हाही साहित्यविषय होऊ शकतो. आणि तो समर्थपणे हाताळता येतो. सजीव, सुबक करता येतो. स्वतंत्र साहित्यकृती म्हणून निश्चित आकार देता येतो हे वरील साहित्यिकांच्या साहित्यकृतीतून जाणवले आहेच. इतकेच नव्हे तर या उपेक्षित जीवनाकडे पाठमोरे होऊन, दुर्लक्ष करून चालणार नाही या जाणिवेनेच तो विषय समजावून घेऊन, आपुलकीने सामावून घेऊन त्यातील मर्म, वेदना, ठणका, दुःखे यांना वाचा फोडण्याचे त्यावर नेमके बोट ठेवण्याचे कार्यही प्रतिष्ठा पावू लागले आहे.

## एक सामाजिक समस्या

यंत्रप्रधान संस्कृती आणि औद्योगीकरण यांची झपाट्याने वाढ होते आहे. जुन्या औद्योगिक शहराबरोबर नवनवी उद्योग प्रधान शहरे वसवली जात आहेत. देशातील कानाकोपऱ्यातून माणसांचे थवेच्या थवे आपला पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता शहराकडे धाव घेत आहेत. नगराना महानगराचे स्वरूप येत आहे. शहरे फुगू लागली आहेत. त्यांच्यावर सूज येऊ लागली आहे. कुटुंब नियोजनाच्या काळातही दिवसेदिवस वस्ती वाढतेच आहे. वस्तीचा ताण असह्य झाला आहे. वाढत्या वस्तीबरोबर वाढती दुःखे, असह्य वेदना, भयाण समस्या वाढताहेत. पक्ष्यांच्या-किडामुंगीच्या घरट्यासारखी, वारुळासारखी वस्ती वाढते आहे. दैन्य, दारिद्र्य, उपासमार, बेकारी, व्यसने, दुराचार, रोगराई, अत्याचार, इत्यादी शतदोषानी 'वस्ती' जर्जर झाली आहे. अनारोग्य, किळसवाणे वातावरण, निकृष्ट आहार, याच्याबरोबरच दादागिरी, गुंडगिरी, हिंसा यांनी थैमान घातले आहे. सांडपाणी, गटारे यांच्या आधारावर झोपड्या तयार होताहेत. जिथे स्वच्छतेचा मागमूस नाही; स्वच्छ पाणी नाही, स्वच्छ हवा देखील नाही. अशा 'नरकनगरी' शहरो शहरी फोफावताहेत. पावसाळ्यात तर या वस्तीची दैना अवर्णनीय असते. अर्धनग्न, अर्धपोटी पोरं-टोरं, मुली-स्त्रिया, तरुण-वृद्ध यांचे दर्शन अंगावर शहारे आणणारे आहे. स्त्री-पुरुष संबंध स्वैर आहे. हत्याकांड सुलभ आहे. रामपुरी चाकू स्वस्त आहे. आणि गेल्या काही

वर्षातील स्थानिक राजकारण, वस्तीच्या पाठिंब्यावर, मतावर निवडून येण्याची स्पर्धा, त्यातून निर्माण होणारे वैमनस्य, गटबाजी, जीवघेणी स्पर्धा यामुळे सारे जीवन 'गढूळ' झालेले आहे. अशा वस्तीचे धावते चित्रण या कादंबरीत आहे.

## वस्तीचे दर्शन

बृहन् मुंबईच्या परिसरातील एका झोपडपट्टीचं हे चित्रण आहे. कादंबरीच्या शीर्षकातील अर्थ आणि सूचकता लक्षात घेण्यासारखी आहे. एका बाजूने औद्योगिक शहरामध्ये संपत्ती, समृद्धी याच्यांत वाढ होते आहे आणि त्यामुळं शहरामध्ये श्रीमंत, धनवान यांचे इमले, सुखाची साधने विपुल प्रमाणात वाढणार आहेत. त्याचप्रमाणं तितक्याच प्रमाणात झोपड्यांची खुराडी सतत वाढत जाणार आहेत. एकाबाजूनं कुबेर नगरीचा लखलखाट, थाट आणि ऐश्वर्य दिसेल तर दुसऱ्या बाजूने नरकपुरीचं भीषण, ओंगळ, कलाहीन, रंग-गंधहीन दृश्य फोफावू लागेल.

अशा वस्तीवर लेखकानं 'फोटोग्राफीक्' फोकस टाकून चित्रण साधलं आहे. त्यात खालची पाखाडी अन् वरची पाखाडी दिसते. त्या पाखाडीत चाळीवजा झोपड्या बांधल्या जातात. काही कायदेशीर अन् बऱ्याच बेकायदेशीरपणे बांधकाम केलं जातं. महानगरपालिकेचे अधिकारी येतात जातात; काही जण पैसे खाऊन दुर्लक्ष करतात तर काही किमान सोयी करण्याचा प्रयत्न करतात. पण एकूण अंधाधुंदी, गैरसोय, निष्काळजीपणाच अधिक दिसतो. स्वच्छता, साफसफाई याची निशाणीसुद्धा नसते. झोपड्या–झोपड्यातून रोगराई, दारिद्र्य, हातभट्टी यांची रेलचेल दिसते. शंकरसारखे सराईत गुंड पोसले जातात. ते आपल्या टाचेखाली असहाय्य, गांजलेल्या, अगतिक अशा शेकडो माणसाना बिनदिक्कत तुडवीत असतात. भडक माथं, अविचार आणि रामपुरी चाकू याच्या आधारावर वस्तीतील आपलं नेतृत्व टिकवू पहातात. डॉक्टरांसारख्या समाज कार्यकर्त्यांना अडथळे आणतात. शांती, चितु, धनाप्पा, सुरजू, अब्दुला, गुरुजी, खानदानी इत्यादींच्या व्यक्तिचित्रणातून कथानक पुढे सरकताना दिसतं.

आजच्या राजकारणाच्या मुशीतून तयार झालेला, वरकरणी समाजसेवेचं ढोंग करणाऱ्या पण स्वार्थी, महत्त्वाकांक्षी गोपूचं दर्शन होतं. गोपू आपल्या हस्तकांच्या, साथीदारांच्या मदतीनं स्वतःचा स्वार्थ साधीत असतो. महानगर पालिकेचे सेवक, अधिकारी यांची 'चाल' त्याला परिचित आहे. बांधकामासंबंधाचे कायदेकानू त्याला ठाऊक आहेत. कोणाची 'मूठ' कशी दाबावी यात तो तरबेज आहे. लोकांचा 'उठाव' कसा करावा हे त्याला ज्ञान आहे. पैसा मिळवायचा, राजकारण करायचं, स्वतःची तुंबडी भरायची, चाळीचा मालक व्हायचं आणि वस्तीचं पुढारीपण मिरवायचं हे गोपूच्या जीवनाचं सूत्र आहे. आजच्या परिस्थितीतून जसे गावगन्ना पुढारी निर्माण होताहेत त्याचेच प्रतीक म्हणजे गोपू. त्याच्या एकूण वर्तनात न्याय, कायदा, प्रामाणिकपणा याचा अंशमात्र लवलेश दिसत नाही. अशा गोपू अन् शंकऱ्यासारखे

सराईत गुंड मारामारी करतात. गोपूचं घर जाळलं जातं. गोपूच्या मुलाचे प्राण वाचविले जातात. अन् कादंबरीच्या शेवटी मात्र गोपूत विलक्षण परिवर्तन होतं...हे मात्र न पटणारं आणि जरी पटवून घेतलं तरी मनाला भावणारं वाटत नाही.

### डॉक्टर

या कादंबरीतील डॉक्टरांचं व्यक्ति-चित्रण मात्र अनेकविध कारणानी भारावून टाकणारं आहे. डॉक्टरांचा प्रामाणिकपणा, सेवाभावी वृत्ती, वस्तीच्या भल्याकरिता आयुष्यभर 'व्रत' म्हणून काम करण्याची जिद्द विलक्षण वाटते. वस्तीतील सुखसोई, गरजा, रोग्यांची काळजी, त्यांचं औषधपाणी करण्यातच डॉक्टर धन्यता मानतात. अन्याय आणि संकटाचेवेळी, अवेळीसुद्धा धावून जातात. प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालतात. लोकांचं भलं करतात. सल्ला देतात. दोष सांगतात. सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न करतात. शांतीसारख्या तरुणीसाठी डॉक्टर जे जे करतात, अगदी शेवटपर्यंत ते कार्य, ती मदत, मार्गदर्शन, उपदेश सर्वकाही विलक्षणपणे चित्रित केलं गेलं आहे.

वस्तीच्या कल्याणाकरिता डॉक्टर तळमळतात. (पृष्ठ ८३) त्यांची पत्नी विचारते, 'कुणी सीरियस आहे का?' ते उत्तर देतात, 'सारे कुटुंब!' (म्हणजे सारी वस्ती!) आणि सकाळी चहासुद्धा न घेता ते व्हिजीटला जातात. असे हृद्य प्रसंग अपवादात्मक का होईना लेखकानं चितारले आहेत. प्रस्तावनेतील लेखकाची व्यथा ही कादंबरी वाचताना राहून राहून मला जाणवत होती अन् लेखक म्हणजेच या कादंबरीतील डॉक्टर असावेत याची कल्पना येत होती.

कादंबरीच्या शेवटी शंकऱ्यासारखा गुंड डॉक्टरांवर विलक्षण आरोप करतो, डॉक्टर शंकऱ्यावर प्रहार करतात. शंकऱ्या सुरा काढतो एवढ्यात स्वतःचा सुरा पोटाखाली सापडून तो मरतो. शंकऱ्याच्या खुनाची जबाबदारी गोपू स्वतःकडे घेतो — हा सारा शेवट वाचकाच्या मनावर परिणाम साधेल इतका 'खोल' वाटत नाही.

—अनेक पात्रं अनेक प्रसंग अनेक घटना, अनेक व्यक्ती, याचं धावतं चित्रण या कादंबरीत आहे. 'समूह प्रधान' कथानक म्हणूनच याचा विचार करणं योग्य!

मी प्रारंभीच म्हटल्याप्रमाणं लेखकानं अनुभवाच्या सामर्थ्यावर वस्तीतील सारे बारकावे, साधे साधे प्रसंग टिपले आहेत. कुठेही भडकपणा, वासनेचे किळसवाणे चित्रण नाही हे जितकं खरं तितकंच लेखनातील कोरडेपणा अलिप्तपणा, तटस्थताही जाणवल्या शिवाय रहात नाही. वस्तीचं प्रामाणिक चित्रण अन् दर्शन घडवून सुद्धा श्री. ना. ग. गोरे यांनी म्हटल्याप्रमाणं 'वस्तीच्या अंतरंगाची तपासणी डॉ. भा. ल. पाटील यांनी परिश्रमपूर्वक केली नाही. ही त्रुटी मनाला खटकल्यावाचून रहात नाही.'

वस्तीचं फोटोग्राफिक चित्रण अन् दर्शन हे यश! आणि वस्तीच्या अंतरंगाचा ठाव घेता आला नाही हे या कादंबरीचं अपयश!

—प्रा. ग. भा. जोशी

**वस्ती वाढते आहे**
डॉ. भा. ल. पाटील,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
किंमत २० रु.

मध्यंतर

# टिल्लू यांचा एकपात्री कार्यक्रम

'प्रसंग लहान विनोद महान' हा मधुकर टिल्लू यांनी सादर केलेला एकपात्री कार्यक्रम, दैनंदिन जीवनातल्या लहान लहान गोष्टींत विनोद कसा दडलेला असतो, ते या कार्यक्रमाच्या द्वारा व्यक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या कार्यक्रमाचे स्वरूप पूर्णत: निवेदन आणि कथन यावरच आधारलेले आहे. त्यामुळे कार्यक्रमाच्या मर्यादा तो व्यक्त करण्याच्या पद्धतीमध्येच ठरल्या गेल्या. नाट्यप्रकारांना निवेदन हे मर्यादित वेळानंतर मारक ठरते. तसे ते याही कार्यक्रमात ठरले. त्या निवेदनाला – कथनाला अभिनयाची साथ हवी. रंगभूमीवर जेव्हा एकच माणूस सतत काही सांगतो, तेव्हा निराभिनय अशी अवस्था घातक ठरते.

टिल्लू यांच्याजवळ नित्य जीवनातील गोष्टींचे निरीक्षण चांगले आहे. त्यातल्या काही प्रसंगांची निवड आणि त्यातला वेचक विनोद कथन करण्याची शैलीही आहे. पण प्रत्येक प्रसंग शब्दांतून पूर्णत्वाने कधीच साकारला जात नाही. त्याला अभिनयाची जोड दिल्याने प्रेक्षक अधिक गुंतून राहतो. त्याचप्रमाणे ज्या विनोदी घटनांची, प्रसंगांची त्यांनी निवड केली आहे, त्याला एक विशिष्ट सूत्र नाही, संगती नाही. त्यामुळे ते विनोद स्वतंत्रपणे ऐकायला किंवा इतरांना सांगायला ठीक असतात. पण त्यामध्ये नाट्यानुभव किती आहे याचाही शोध घेणे महत्त्वाचे ठरते !

पु. ल. देशपांडे, सुहासिनी मुळगावकर, मुरलीधर राजूरकर, कुसुम कुलकर्णी, रंगनाथ कुलकर्णी इत्यादी अनेकांनी एकपात्री – बहुरूपी प्रयोग रंगभूमीवर सादर केलेले आहेत. त्यांच्या यशापयशाचा विचारही टिल्लू यांनी करावा असे सुचवावेसे वाटते. टिल्लू यांना विनोद व्यक्त करण्यासाठी आवश्यक असणारा चेहरा आहे. अधिक प्रयत्नाने ते एकपात्री प्रयोगात किमान यशाचा टप्पा गाठू शकतील. त्यासाठी त्यांनी स्वत: एखादा कार्यक्रम लिहून किंवा कोणा जाणकार लेखकाकडून लिहून घेऊन सादर करावा. त्या सलग कार्यक्रमात त्यांच्या अभिनयाचा कस अधिक लागेल. तोच कस त्यांच्या कलात्मक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल.

–वि. भा. देशपांडे

## वाढती कमान

पृष्ठ ३ वरून

असे पाहून ऑफिसच्या व्हरांड्याला लावलेल्या लाकडी जाळीच्या आड लपून त्याने लगेच गोळीबार सुरू केला. रेंजरजवळची बंदूक त्याने घेतली असावी. त्या ऑफिसच्या बाहेर रस्त्याच्या कडेला उभा असलेला राजेश चंडालिया हा सतरा वर्षाचा मुलगा जागच्या जागी ठार झाला. आणखी दोन जणांचे या गोळीबारामुळे मुडदे पडले.

तिकडे पोलीस स्टेशनजवळ जमलेला जमाव पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करीत होता. परिस्थिती चिघळत चालली आहे असे पाहून वणीतले स्वातंत्र्य सैनिक श्री. बळीभाऊ येलगुंदवार हे पोलीस स्टेशनमध्ये गेले. त्यांनी श्री. पालवेंना सांगितले की, तिकडे परिस्थिती फार बिघडली आहे. जनता म्हणते आहे तर तुम्ही पुढाऱ्यांना सोडून द्या म्हणजे ते लोकांना शांत करतील. श्री. पालवे तयार झाले. बाहेरची गडबड पाहून ते पोलिसांना लाठ्याकाठ्या उचलायला आणि बंदूका घेऊन बाहेर जायला सांगत होते. हे पाहून आमदार नांदेकर व इतर कार्यकर्ते श्री. पालवेंना म्हणाले की, तुम्ही लोकांच्यावर लाठीहल्ला वा गोळीबार करू नका. आता तुम्ही त्या जमादाराला शिक्षा करण्याचे कबूल करा म्हणजे लोक शांत होऊन घरी जातील. तसेच तुम्ही एस. डी. ओ. नाही बोलावून घ्या. श्री. पालवे ठीक आहे ठीक आहे म्हणाले. श्री. नांदेकर वगैरे कार्यकर्ते पोलीस स्टेशनच्या बाहेर पडले. रिक्षावर उभे राहून ते लोकाना सांगत होते की, आपापल्या घरी जा किंवा तिकडे गांधी चौकाकडे चला. या दरम्यानच्या काळात फॉरेस्ट रेंजर श्री. देशपांडे यांच्या घराला आग लागली होती. दगडफेकही चालू होती. तेव्हा श्री. पालवे स्वतः हातात बंदूक घेऊन गोळीबार करीत निघाले. एस्. आर. पींनीही गोळीबार सुरू केला. सर्वश्री. नांदेकर रेभे, शेंडे यांच्या पाठीमागून हा गोळीबार चालू होता. एक गोळी शेंडेना चाटून गेली. नांदेकरही थोडक्यात बचावले. आणखी तीन जणांचे जागच्या जागी मुडदे पडले. शिवाय ६–७ जणांना गोळ्या लागल्या होत्या. त्यापैकी विजय उपलेंचवार (यवतमाळ जिल्हा सहकारी बँकेतील कारकून) आणि रामकृष्ण रामचंद्र झिलपे (धंदा सुतारकाम) यांना चंद्रपूर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे ता. ३ ला श्री. झिलपे मरण पावला. उपलेंचवारच्या लिव्हरमध्ये घुसलेली गोळी ता. ४ जानेवारीपर्यंत निघाली नव्हती. मदन तिवारी हा एक छोटा दुकानदार पोस्टाजवळ उभा होता. एक विद्यार्थी दगड मारीत होता. त्याला त्याने थांबविले. श्री. पालवे याच्याजवळ आला तेव्हा "तुम्ही गोळीबार करू नका. गोळीबाराची गरज नाही" असे तो ओरडून म्हणाला. पण पालवेंनी त्याच्यावर पिस्तूलाने गोळ्या झाडल्या. एक गोळी शरिरातून बाहेर पडली व

एक चाटून गेली. वणीच्या हॉस्पिटलमध्ये इलाज केल्यानंतर ता. ३ ला तो आपल्या घरी आला. बापूराव रामकृष्ण अकिनवार (धंदा शिंपी, वय २५) आणि भास्कर दामोदर गंधे (वय ३०, शिवनाळ या गावचे पोलीस पाटील) हे लुलेकार यांच्या घराजवळ उभे होते. म्हणजे रेंजर ऑफिसपासून सुमारे ३०० फुटावर. पोलीस ठाण्यातील माणसे परत येत होती. लोकांना घरी जा असे नांदेकर सांगत असलेले त्यांनी पाहिले. एवढ्यात त्यांनाही बंदुकीच्या गोळ्या लागल्या. ता. ४ जाने. रोजी ते वणीच्या हॉस्पिटलमध्येच होते.

गोळीबारात जागच्या जागी ठार झालेल्यांची नावे– १ : राजेश चंडालिया, वय १७, विद्यार्थी, २ : वासुदेव वाघ, वय १९, ऑईल मिल कामगार, ३ : भास्कर मांडवकर, वय २४, विराणी टाईल्स कंपनी मॅनेजर, ४ : पूना गिड्डे, वय ४२ मोची धंदा, ५ : दौलत घुंड, वय ५०, नगरपालिकेच्या जकात खात्याचा चपराशी, ६ : कवडू पहाड, वय २०, धंदा वनमाळी. सध्या मिळेल ती मोल मजूरी.

(या शिवाय श्री. झिलपे चंद्रपूरच्या हॉस्पिटलमध्ये निधन पावल्याचा उल्लेख वर आलाच आहे.)

साडे अकराच्या सुमाराम श्री. पालवेंनी सरसकट गोळीवार सुरू केल्यानंतर जमाव बाजारपेठेकडे गेला. तेथील विदर्भ विणकर सोसायटीचे व तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अशी दोन कापडाची दुकाने, एक छोटे किराणा दुकान, एक दारूचे आणि ॲड. जैन यांनी नव्याने सुरू केलेले कापड दुकानही फोडून लोकांनी लुटालूट केली. तसेच यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. विठ्ठलराव गोहोकार यांच्या घरी जाऊन काही जणांनी लुटालूट केली. पंचायत समितीचे सभापती श्री. बळीभाऊ सातपुते यांच्या घरी जाऊन लोकांनी त्यांना नुसत्या अंडरवेअरवर बाहेर काढले व गावातून मिरवत मिरवत टिळक पुतळ्याजवळ आणले व तेथे पडलेल्या प्रेतांना नमस्कार करायला लावला.

सकाळी दहाला गोळीबारात बळी पडलेल्यांची प्रेते दुपारी दोनपर्यंत उचलली नव्हती. दोनच्या सुमारास यवतमाळचे जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. बाम वणीला पोहोचले. पोलीस स्टेशन समोर जी माणसे उभी होती त्यांच्यावर त्यांनी लगेच लाठी चालवायला सुरुवात केली. तेव्हा एक काँग्रेस कार्यकर्ते श्री. चंडालिया, श्री. सातपुते गुरुजी व इतर जणांनी त्यांना सर्व परिस्थिती शांततेने समजावून घेण्याची विनंती केली. नागपूरला फोनवरून संपर्क साधला गेला. त्यानंतर श्री. बामनी श्री. तिवारींना विलंबित केल्याचे जाहीर केले व जनतेसमोर दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर लोक शांतपणे आपापल्या घरी गेले. त्यानंतर १४४ कलमानुसार जमावबंदीचा हुकूम जारी करण्यात आला. पोलिसांनी लोकांना दिसेल तेथे दमदाटी व मारपीट करायला सुरुवात केली. रात्री बारा वाजता

आपल्या मित्राकडून घरी चाललेले सुरेश मक्कालाल बिहारी, न. पा. प्राथमिक शाळा नं. १ मधील चपरासी, यांना लाठ्यांनी मारले. अशी कित्येक उदाहरणे आहेत.

या सर्व घटनांवरून पुढील निष्कर्ष निघतात–

१ : जबरदस्तीने एस. टी. बसेस चालू करायला लावणारे सर्कल इन्स्पेक्टर श्री. पालवे, बस स्टँडवर एका लहान मुलाला मारहाण करणारे जमादार आणि शीरपूरचे सब इन्स्पेक्टर श्री. तिवारी यांच्या अरेरावी व घमेंड-खोर वर्तनामुळेच वणीतील वातावरण चिघळत गेले. श्री. तिवारी यांनी तर तीन निरपराध नागरिकांचे दिवसा ढवळ्या खून पाडले आहेत. श्री. पालवेंनी परिस्थिती शांतपणे न हाताळता व सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटची परवानगी न घेता बेछूट गोळीबार सुरू केला.

२ : नागरिक किंवा बंदचे संघटन करणारे कार्यकर्ते पूर्णपणे शांततेने बंदचा प्रचार करीत होते. पोलिसांच्या जुलमी वर्तणुकीनंतरच काही जणांनी चिडून जाऊन लुटालूट व जाळपोळीचे प्रकार केले. त्यातही हे लक्षात घेण्यासारखे आहे की लोकांचा सर्व राग तिवारींनी आश्रय घेतलेले फॉरेस्ट रेंजरचे कार्यालय व घर आणि भ्रष्ट काँग्रेस कार्यकर्त्यांचे घर व त्यांचा संबंध असलेल्या सोसायट्यांची दुकाने यावरच निघाला. एस. टी. बस स्टँड, तेथे उभ्या असलेल्या बसेस, स्टँडजवळील हॉटेल व समोरील दोन पेट्रोल पंप यापैकी कशालाही लोकांनी हानी पोहोचवली नाही. बाजार पेठेतील सर्व दुकाने बंद असताना व पोलीस बंदोबस्त अतिशय अपुरा असतानाही भ्रष्ट काँग्रेसवाल्यांची घरे, दुकाने व संस्था यांचीच लुटालूट झाली.

एस. पी. श्री. बाम यांनी ता. २ जाने. ला श्री. तिवारी यांना निलंबित केल्याची घोषणा केली. त्यांनी केलेल्या अनधिकार व बेछूट गोळीबारामुळे त्यांच्यावर ही कृती करण्यात आली असा लोकांचा समज झाला. पण ता. ३ जाने. ला पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. बाम म्हणाले की तिवारीवरील कृती गोळीबाराच्या संदर्भात नाही, काही अंतर्गत प्रकरणाच्या संदर्भात आहे.

यातून दोन निष्कर्ष निघतात. १ : श्री. तिवारींची इतर अशी काही कृत्ये आहेत की ज्यांच्यासाठी त्यांच्यावर खात्यामार्फत कारवाई केली जात आहे. २ : गोळी-


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

बाराच्या संदर्भात त्यांना वाचवण्याचे पद्धतशीर प्रयत्न वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सुरू केले आहेत.

या सर्व गोष्टी लक्षात घेता न्यायाच्या दृष्टीने मी पुढील मागण्या करीत आहे.

१. श्री. तिवारी व श्री. पालवे यांना खुनाच्या आरोपावरून तात्काळ अटक करण्यात यावी. मॅजिस्ट्रेटिअल चौकशी पूर्ण होईपर्यंत थांबण्याची गरज नाही. जाळपोळ व लुटालुटीचे गुन्हे नोंदवून संशयितांची धरपकड जर मॅजिस्ट्रेटिअल चौकशीच्या आधी होऊ शकते तर खुनासारखे गंभीर गुन्हे करणारावर तात्काळ कायदेशीर कारवाई करायला काहीच हरकत नाही.

२ : गोळीबारात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना प्रत्येकी एक लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. श्री. चंडालिया खेरीज बाकीच्या मृत व्यक्तींची कुटुंबे अतिशय गरीब असून कर्त्या पुरुषांनाच पोलिसांच्या गोळ्यांनी टिपले आहे. त्या कुटुंबियांच्या चरितार्थाची जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे.

३ : वणीत पोलिसांनी अधिक दडपशाही करू नये, निरपराध, नागरिकांना विनाकारण खटल्या खोटल्यात गुंतवू नये. तसेच स्वस्त धान्य दुकानातील धान्य पुरवठा वाढविण्यात यावा व बेकारांना काम देण्यात यावे.

वणीच्या घटनांची माहिती राज्य गृहमंत्र्यांनी ता. २ जाने. ला अतिशय अर्धवट स्वरुपाची दिली. कुणीही पोलिसाला जखम झाली नसताना वीस पोलीस जखमी झाले असे त्यांनी म्हटले. घटनांचा क्रमही त्यांनी उलटा सांगितला. वास्तविक तिवारीने गोळीबार आधी केला व त्यानंतर जाळपोळीचे प्रकार झाले. श्री. पवारांनी सांगितले की प्रक्षुब्ध जमावाने आगी लावल्या म्हणून गोळीबार करण्यात आला. आपले भ्रष्ट अधिकारी खोटी किंवा अर्धवट माहिती पुरवतात असा अनुभव श्री. शरद पवारांना देदाळे, शहादे अशा कैक प्रकरणात आला असताना वणीच्या घटनाबद्दल बोलताना त्यांनी अधिक खबरदारी घ्यायला पाहिजे होती. भ्रष्ट अधिकाऱ्यावर फार विसंबून राहू नये असा मित्रत्वाचा सल्ला श्री. शरद पवारांना द्यावासा वाटतो.

वणीच्या घटनांनी आणखी एक गोष्ट लक्षात येते. गेल्या दोन तीन वर्षात ग्रामीण भागातील असंतोष राजकीय दृष्या संघटित होत आहे. तो दडपून टाकण्यासाठी काही भ्रष्ट पोलीस अधिकारी, काही ठिकाणी तर भ्रष्ट काँग्रेसवाल्यांच्या चिथावणीवरून, एकदम गोळीबार करून निरपराध जीवांचे बळी घेत आहेत. वैराग, लातूर, सिन्नर, मालेगाव, इस्लामपूर, तुमसर, फैजपूर अशी ही यादी दिवसें दिवस लांबू लागली आहे. पोलिसांना गोळीबार करण्याचा मोह उत्पन्न होऊ नये म्हणून माझी अशी आग्रहपूर्वक मागणी आहे की ग्रामीण भागातील राजकीय जनआंदोलनांच्या बंदोवस्तासाठी जाणाऱ्या पोलिसांजवळ हिंसक शस्त्रे देऊ नयेत, फक्त अश्रूधुराची नळकांडी द्यावीत.

● ● ●

# टॉलस्टॉय - एक माणूस

एक अप्रसिद्ध प्राध्यापिका. मुक्काम मुंबई. प्रथमश्रेणीचे यश, फेलोशिप, पारितोषिके इत्यादी मानसन्मान लाभलेली. संस्कृत, मराठी, इंग्लीशमधील अभिजात साहित्य हा अध्ययन-अध्यापनाचा, चिंतनाचा विषय. एका सुट्टीत टॉलस्टॉयची 'वॉर अॅन्ड पीस' ही दोन हजार पृष्ठांची प्रचंड कादंबरी वाचायला घेतली आणि प्राध्यापिका अक्षरशः टॉलस्टॉयमय होऊन गेली.

टॉलस्टॉयने लिहिलेले सर्व साहित्य या झपाट्यात वाचून झाले. पण यातून जागृत झाले टॉलस्टॉय या व्यक्तीविषयीचे जबरदस्त कुतूहल. मग सर्व चरित्रे पाहून झाली. त्यांचा तुलनात्मक अभ्यास झाला. संत टॉलस्टॉय, विषयोपभोगात आकंठ बुडालेला टॉलस्टॉय; काऊंट टॉलस्टॉय आणि शेतमजूर टॉलस्टॉय; साहित्यिक टॉलस्टॉय आणि चळवळ्या टॉलस्टॉय–गुंतागुंत वाढतच गेली. ही उलगडण्यासाठी टॉलस्टॉय साहित्य आणि टॉलस्टॉय चरित्राबरोबरच आत्मचरित्रात्मक सर्व टिपण्या, दैनंदिन्या, पत्रे, स्मृतीग्रंथ, मुलामुलींनी व शेजाऱ्यापाजाऱ्यांनी लिहिलेल्या आठवणी, इतर समकालिनांच्या दैनंदिन्या, तत्कालिन प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे, टॉलस्टॉयकालीन रशियाचा राजकीय–सांस्कृतिक इतिहास–भूगोलसुद्धा; मुंबईस येणाऱ्या-जाणाऱ्या निवडक रशियन व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटीगाठी; अगदी आज अमेरिकेत हयात असणाऱ्या टॉलस्टॉयच्या वृद्ध कन्येशी पत्रव्यवहार–प्राध्यापिकेने यापैकी काहीही करावयाचे, उलगडावयाचे बाकी ठेवले नाही,

अनेक वर्षे या शोधात आणि चिंतनात गेल्यावर प्राध्यापिकेला वाटू लागले, की हे सर्व लिहून काढावे. आपल्याला गवसले ते इतरांना दाखवावे. पण आपण कुणी लेखिका वगैरे नाही ही एक खंत होती. शेवटी ज्यांनी प्राध्यापिकेचे हे सगळे श्रम, यातून तिच्याजवळ जमा झालेले प्रचंड टॉलस्टॉय भांडार जवळून पाहिले, त्यांच्या सततच्या आग्रहाला आणि प्रोत्साहनाला यश आले आणि टॉलस्टॉय जीवनाचा सर्वांगाने वेध घेणारी भरीव आणि भारदस्त, सर्वांगसुंदर आणि अंतःकरणाचा सरळ ठाव घेणारी एक प्रेरक चरित्रकृती साकार झाली.

प्राध्यापिका : सौ. सुमती देवस्थळे

चरित्रकृती : टॉलस्टॉय–एक माणूस

**प्रकाशन !**


पृष्ठ ४८ पहावे.

# टॉलस्टॉय–एक माणूस

लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

## पूर्वग्राहक : विनामूल्य भेट : योजना

कागद, छपाई, बांधणी इत्यादींचे भडकते भाव पहाता टॉलस्टॉय–एक माणूस लेखिका : सौ. सुमती देवस्थळे या चरित्रग्रंथाची किंमत अगाऊ निश्चित करता येत नाही. तरी ती रुपये तीस ते चाळीसच्या घरात जावी असा अंदाज आहे. आपण वीस रुपये भरून पूर्वग्राहक म्हणून नोंदणी करावी. ग्रंथ पाठविण्याचा टपाल-पॅकिंग इत्यादी खर्च मात्र आपल्याला करावा लागणार आहे. [ वीस रुपये दोन सारख्या हप्त्यात भरण्याचीही सवलत आपण घेऊ शकता. ]

- पाच वर्षांची साप्ताहिक माणूसची किंवा चित्रवार्ता पाक्षिकाची रुपये शंभर ही वर्गणी आपण एकदम भरली तर हा ग्रंथ आपणास विनामूल्या मिळेल. पाठवणी-खर्च आपल्याकडे राहील.
- पाच वर्षांसाठी रुपये शंभरची ठेव ' राजहंस प्रकाशन 'कडे ठेवली तरी हा ग्रंथ विनामूल्य मिळू शकेल. पाठवणीखर्च ठेवीदाराचा.
- सव्वाशे रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपण विकत घेतलीत तर हा ग्रंथ विनामूल्य देण्यात येईल. पाठवणीखर्च ग्राहकाचा.
- ग्रंथ १९७४ अखेर प्रसिद्ध होईल.
- ठेव असल्यास ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्ट किंवा म. ऑ. ने रक्कम पाठवावी.
- पाच वर्षांची वर्गणी पाठविणे असल्यास ड्राफ्ट ' व्यवस्थापक माणूस ' या नावावर पाठवावा व सोबतच्या पत्रात चित्रवार्ता पाक्षिक किंवा साप्ताहिक माणूस यापैकी कुठला अंक हवा त्याचा खुलासा करावा.
- चेकने रक्कम पाठवणाऱ्यांनी वटणावळ म्हणून एक रुपया अधिक पाठवावा.
- या टॉलस्टॉय पुस्तक योजनेची मुदत ३१ मार्च १९७४ पर्यंत आहे.

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पुणे–४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. PNC-68

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे<br>श्री. ग. माजगावकर | १-०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३-५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३-५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३-५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४-०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४-०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७-०० |
| ८. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २-०० |
| ९. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २-०० |
| १०. | पूर्णिया | अनिल अवचट | ६-०० |
| ११. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७-०० |
| १२. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८-०० |
| १३. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०-०० |
| १४. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०-०० |
| १५. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२-०० |
| १६. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४-०० |
| १७. | अग्निपुत्र | वसंत पोतदार | १४-०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५-०० |
| १९. | व्होल्गा जेव्हा लाल होते | वि. स. वाळिंबे | १८-०० |

**आगामी प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| २०. | शतपावली | रवींद्र पिंगे |
| २१. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर |
| २२. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |
| २३. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० : ५१३५९**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर